# चैतन्य सुमने

अंक ०७ ०८ फेब्रुवारी २०२५

## संपादकीय



'चैतन्य सुमने' या नियतकालिकाचा हा सातवा अंक प्रसिद्ध करताना आनंद होत आहे. भक्तांची शब्द सुमने श्रींच्या चरणाशी वाहण्याची भावना लक्षात घेऊन संस्थानतर्फे एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या कल्पनेने हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येत आहे. यापुढेही आपले लेख chaitanya.smaran23@gmail.com या ईमेल वर 'चैतन्य सुमने साठी' अशी नोंद करून पाठवाव्या.



**श्रीगोंदवलेकर महाराजांचा जन्म माघ शुद्ध द्वादशी शके १७६६ (१९ फेब्रुवारी १८४५) या शुभदिनी झाला. या वर्षी तिथीप्रमाणे जन्मदिवस हा ९ फेब्रुवारी रोजी आहे, या निमित्ताने पु. बाबा बेलसरे रचित श्रीमहाराजांचा पाळणा**

## श्रीमहाराजांचा पाळणा

किती हाससी बा गोड गोड लडिवाळा
तुज नीज न ये का बाळा ॥ धृ.॥
अपरात्रीचा समय जाहला बाई ।
तरी वेडा निजतची नाही ।
का आत्मसुखी जागसी रे मुनिराया ।
अज्ञान मग्न जगवाया ॥
का दिसतो रे तापसीयांचा मेळा ।
तुज निमिषारण्यी सगळा ।
वळविसी मुठी जोराने । हुंकार देसी तू वदने ।
भुलवीसी किती प्रेमाने ।
रघुवीराची मूर्ती दिसे तव डोळा ।
तुज नीज न ये का बाळा ॥१॥

गुरुशोधाचा ध्यास लागला बाई ।
मनीं चैन पडेना काही ।
का चिंतीसी बा नाम कसे पेरावे ।
नामात जगा भुलवावे ।
तव शिष्यांची वृत्ती दूर साराया ।
जागतोसी का रे राया ।
ही वळवळ इतुकी कैसी । लोकांच्या कल्याणाची ।
वा दीनांच्या दुःखाची ।
त्या जांबेचा रामदास तू आला ।
तुज नीज न ये का बाळा ॥२॥

रघुरायाचे प्रेम दाटले बाई । नयनात चमकते पाही ।
किती गोड तुझा पापा रे गणुराया ।
नीज नीज शिणते काया ।
का दाखवू रे बागुल भिववायास ।
बलभीम रघूचा दास । आनंद कशाचा झाला ।
बाई सारे कळले मजला । मारुतीराय अवतरला ।
तव हृदयीं बा नामाचा हा चाळा ।
तुज नीज कशाची बाळा ॥३॥

**पू. बाबा बेलसरे**

# नाम व चार वाणी
## परेपासुनी वैखरीपर्यंत, करावे रामचिंतन

परमार्थ हा आतील प्रवास आहे, सामान्य माणसाला अंतरंगात उतरण्यास म्हणजे भगवंतापर्यंत पोचण्यास नामस्मरण हे जितके उपयोगी पडते तितके इतर काही उपयोगी पडत नाही. ऋषिमुनींनी ज्या चार अवस्था सांगितल्या त्याला अनुसरून शब्दाच्या चार वाणी असतात.
**१) वैखरी - जागृति २) मध्यमा - स्वप्न ३) पश्यंती- सुषुप्ति ४) परा - तुरीया**, अर्थात तुरीयेपर्यंत पोचण्यास वाणीचा एकमेकीत लय करीत जाणे जरूर आहे.

लय करण्याच्या या प्रक्रियेत नामस्मरण हे सोपे, खात्रीलायक, शास्त्रशुद्ध व अनुभवसिद्ध साधन आहे, असे सर्वसंतांचे व श्री महाराजांचे सांगणे आहे. भारतीय वेदवाङ्मयातसुद्धा चार वाणीविषयी वर्णन आढळते. ऋग्वेद, यजुर्वेद, व अथर्ववेदात पुढील मंत्र आहे.




चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिण:
गुहात्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति
ऋग्वेद, अष्टक २ सुक्त १६४

**अर्थ:** चार वर्गात वाणीची गणना केलेली आहे. ही गोष्ट वेदवित मेधावी ब्राह्मण आहेत ते लोक जाणतात. त्या चार वाणीमधे **परा, पश्यंती** व **मध्यमा** ह्या तीन्हींचे आकलन होणे कठिण आहे. कारण ते रहस्यमय आहे. चवथी वाणी–**वैखरी**– जी आहे तिचा उपयोग करून माणसे बोलतात.

ज्याप्रमाणे वरून घसरत घसरत वैखरी पर्यंत आपले मन स्थूल झाले त्याच प्रमाणे नामाच्या सहाय्याने उलट्या दिशेने म्हणजे वैखरी पासून परेपर्यंत पोचण्याचा हा मार्ग आहे. याचे विवेचन पू. बाबा बेलसरे यांनी अत्यंत सखोलतेने व बारकाईने चिंतन करून, अनुभव घेऊन आपल्या छोट्या मोठ्या पुस्तकांत शब्दांकन केलेले आहे. ती वचने एकत्र करून अवलोक केले असता चारी वाणींचे आकलन व्हावयास व चिंतन करावयास नामधारकाला खूप मदत होते. आपण कोणत्या मुक्कामात आहोत याची सुस्पष्ट कल्पना येते सर्व नामोपासकांना नामात अधिकाधिक प्रेम उत्पन्न होवो हीच श्रीमहाराजांच्या चरणी प्रार्थना

(पू. बाबा बेलसरे यांच्या छोटया मोठ्या पुस्तकातून संकलित केलेली वचने)

विचार सुमने

## नाम व चार वाणी

# १. वैखरी

> ओठ व जीभ यांची हालचाल करून म्हणजेच वैखरीने नामस्मरण करणे बहुतेकांना सोयीचे व लाभदायक असते. वैखरीने नामघोष करण्याला अंगात शक्ति लागते; ती सर्व परिस्थितीत टिकतेच असे नाही. तसेच साधकाला व्यवहारही सांभाळावा लागतो. आणि त्यासाठी त्याला इतर बोलावे लागते. व्यक्तिश: किंवा समूहाने वैखरीने नामोच्चार करायला अशा तऱ्हेच्या मर्यादा असतात.

**श्रीमहाराज**

१. पहिली वाणी वैखरी होय आपण तोंडाने हळू किंवा मोठ्याने जी बोलतो ती वैखरी. जागेपणचे मन हिच्या सहाय्याने आतील बाहेर व्यक्त करते आणि त्याचप्रमाणे बाहेरील आत घेते. वैखरी मध्ये तोंडाची, जिभेची, आवाजाच्या पेटीची हालचाल होते. आणि अशीच मेंदूतील शब्दकेंद्राची चळवळ चालू असते.

२. तोंडातून उच्चारलेले शब्द ही वैखरी वाणी होय. परावाणीतून स्फुरलेले जे ज्ञान आहे, वैखरीमध्ये त्याला दृश्यपणा येतो.

३. सूक्ष्म व स्थूल शरीराला चिकटून असते.

४. वैखरीतील नाम अन्नमय व प्राणमय कोषात चालते. ते नाम जेव्हा तेवढ्यापुरतेच असते तेव्हा नामधारक संपूर्ण संसारी असतो. तो मुळी प्रपंच सुधारण्यासाठीच किंवा तो नीट चालण्यासाठीच नाम घेतो. ते सुद्धा स्वतःच्या सोयीने थोडासा वेळ काढून घेतो. परमार्थाशी त्याचा संबंध दूरान्वयाने पोचतो.

५. चारही वाणी एकमेकात गुंतलेल्या असल्याने परावाणीचे स्वच्छ प्रतिबिंब वैखरीत पडलेले दिसते, वैखरी बीज रूपाने परावाणीत वास करते. म्हणून उत्तम साधकाने वैखरीचा त्याग करू नये.

६. वैखरीतील नामाहून वृत्ती सूक्ष्म असते. वैखरीतील नामाला वृत्ती जुमानत नाही.

७. वैखरीने नाम घेत असता त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागत नाही.

८. वैखरी वाणीच्या लहरी स्थूल असून रेडियोसारख्या यंत्राने त्या कोठेही पाठवता येतात. तसेच त्या मुद्रित करून ठेवता येतात.

९. नामस्मरण करु लागल्यावर प्रथम केवळ स्थूल नादलहरी उत्पन्न होतात. परंतु वैखरीने नामाच्या चिकाटीचा अभ्यास झाल्यावर त्या लहरी विनासायास सूक्ष्म बनत जातात.

१०. वैखरीने नाम घेताना मन भरमसाट विचार करीत इतस्तत: धावत असते.

११. वैखरीचा आणि आपल्या श्वास प्रक्रियेचा निकट संबंध आहे. प्राण्यांच्या श्वास प्रक्रियेमधे एक नैसर्गिक लय असते. वैखरीने पुष्कळ नाम घेतले की ती लय जपामधे अवतरते.

१२. आपण तोंडाने शब्द उच्चारतो तेव्हा त्यास एक नाद असतो. नादामधे लय असेल तर ती ऐकण्यामधे आपण रमतो.

## नाम व चार वाणी

१३. नामाच्या अभ्यासामधे वैखरीत, मध्यमेत प्रवेश करण्यास फार कष्ट पडत नाहीत.

१४. वैखरीने नामाचा अभ्यास आरंभला की फालतू बोलणे आपोआप कमी होते.

१५. साधकाने आधी वैखरीने चिकाटीने नाम घेत जावे. पुढील प्रगती आपोआप होते.

१६. वैखरीने नामाचा चांगला अभ्यास झाला म्हणजे तोंड बंद असून जीभ व ओठ न हलता आतमध्ये नाम चालू रहाते. पुष्कळ वेळा आतल्या आत जीभ थोडी हलते. आणि गळ्यात म्हणजे आवाजाच्या पेटीमधे नामाचा स्पंदन अनुभवास येतो, वैखरी तर नाही पण मध्यमा सुरु झाली नाही, असे हे नाम असते. थोडा वेळ तोंड बंद करून नाम चालले की बंद पडते. तोंड उघडून वैखरीने जप केला की पुन्हा तोंड बंद करून ते चालू होते. तोंड बंद करुन नाम सारखे चालू ठेवण्यास अधिक लक्ष द्यावे लागते - हाच चित्त नामामध्ये केंद्रित करण्याचा आरंभ होय. असे जरी झाले तरी मन आपल्या मार्गाने नाना तऱ्हेचे विचार करीत भरकटत असते.

### २. मध्यमा

> “ जड व सूक्ष्म यांच्या मधली म्हणून ही मध्यमा वाणी. त्या स्थितीत ओठ व जीभ हयांची हालचाल नसते, तर वाणीचे मेंदूतले जे केंद्र तेथे ज्ञानाचे सूक्ष्म स्पंदन चालू असते. येथून या नामाला शारिरीक शक्ति आवश्यक रहात नाही व बाह्य परिस्थितीशी संबंध कमी होऊ लागतो. वैखरीने व मध्यमेत नाम चालत असताना आपण ते कानाने ऐकण्याचा प्रयत्न करीत रहावे, याने एकाग्रता साधण्यास फार मदत होते. ”

श्रीमहाराज

१. दुसरी वाणी मध्यमा होय. जागेपणचे मन म्हणजे सबंध मनाचा दर्शनी भाग होय. जागेपणी आपण व्यवहार करीत असता आपल्या मनाचा वरवरचा भागच जरी काम करताना दिसला तरी लगेच त्याच्या मागे असणारा मनाचा भाग देखील प्रत्येक व्यवहारात अप्रत्यक्षपणे तितकाच भाग घेत असतो, यात संशय नाही. अर्थात हे खालचे मन काम करताना वैखरीला जोडून असलेली पण प्रकट शब्द न करणारी अशी जी आतील वाणी (जागेपणचीच) तिचा उपयोग करते. या वाणीला मध्यमा असे म्हणतात. ही पूर्ण प्रकट नाही तशीच पूर्ण अप्रकट नाही, जड शब्दाच्या रुपाने ऐकू येणारी वैखरी आणि केवळ अर्थरूप असणारी सूक्ष्म पश्यंती या दोहींच्यामधे वास करते. किंबहुना या दोघींना जोडते म्हणून मध्यमा होय. मध्यमे मध्ये आवाजाच्या पेटीची सूक्ष्म हालचाल आणि मेंदूतील शब्दकेंद्राची चळवळ चालू असते. वर्गामध्ये विद्यार्थी प्राध्यापकाच्या तोंडाकडे पहात असतो, पण त्याच्या आतमधे अनेक विचारांनी सारखे शब्द कल्लोळ उठत असतात. याठिकाणी नाम घेता आले की, समजावे आपण मध्यमेत प्रवेश केला.

२. वैखरीच्या मानाने मध्यमा अधिक व्यापक व गुंतागुंतीची असल्याने येथे नाम स्थिर होण्यास वेळ लागतो.

## नाम व चार वाणी

३. तोंड बंद आहे, जीभ स्वस्थ आहे, आतमधे नाम चालू आहे. परंतु नामाच्या खालून कोठून तरी अनेक विचार वर येतात. आणि नामाला झाकून टाकतात. याठिकाणी चांगली सावधानता लागते. पहिल्या पहिल्याने खालील विचारांच्या व विकारांच्या प्रवाहाबरोबर नाम वाहत जाऊन आपल्याला त्याचा विसर पडेल. पण अभ्यास जसजसा वाढत जाईल तसतसे नाम अधिक घट्ट रुतेल आणि विकार व विचार येऊन गेले तरी ते जागचे हालणार नाही. या पायरीवर असताना भगवंताची प्रार्थना फार उपयोगी पडते.

४. मध्यमेत नाम स्थिर झाले असता मधून मधून आपण कोठे आहोत, कसे आहोत याचा विसर पडतो. हाच जागेपणचा लय होय.

५. मध्यमा स्थूल असल्याने स्थूल व सूक्ष्म देहांना चिकटून असते आपण मनामधे जे बोलतो ते मध्यमेत बोलतो. ती नादरूप आहे. मेंदूतील केंद्रावर ती अवलंबून असते.

६. परावाणीतून स्फुरलेले जे ज्ञान असते. मध्यमेत त्यास शब्दाचा अव्यक्त आकार येतो.

७. मध्यमेचे नाम जेव्हा मनोमय व प्राणमय कोषात राहते तेव्हा नामधारक साधक बनण्याच्या मार्गावर असतो. नाम रंगण्याचे त्याचे ध्येय निश्चित झालेले असते. परंतु मनावरील स्वामित्व कमी पडते.

८. मध्यमा वाणीमधे तोंड बंद ठेवून नाम घेण्यास अडचण पडत नाही. जीवनात स्वतःचे कर्ते पण प्रधान असते. परंतु सद्गुरुचे कर्तेपण जाणवल्यावाचून रहात नाही. ती जाण फार वेळ टिकत नाही इतकेच.

९. एकीकडे नाम चालू असते. आणि दुसरीकडे हवे नको पणाचा आणि आवडी निवडीच्या संकल्प विकल्पांचा प्रवाह चालू असतो. मधून मधून डुलकी लागते.

१०. मध्यमेतील नाम काहीतरी उपाधी असल्याशिवाय (जागा, वेळ, स्नान, माळ, संगीत, आसन, प्रकृति, संख्या) इत्यादि शिवाय चालू ठेवता येत नाही. शिवाय मी नाम घेतो म्हणून न घेणाऱ्याहून बरा आहे अशी प्रामाणिक पण भ्रामक भावना असते. क्रोध, लोभ आणि द्वेष नको वाटतात. पण सुटलेले नसतात.

११. मध्यमेतील नामाहून वृत्ती सूक्ष्म असते. ती या नामाला जुमानीत नाही.

१२. सामान्यतः मनन मध्यमेमधे चालते.

१३. मध्यमेत नामाच्या बाह्यरूपाकडे म्हणजे शब्दाकडे अधिक लक्ष ठेवले जाते.

१४. ओठ आणि जीभ यांची मुळीच हालचाल न होता, इतकेच नव्हे तर आवाजाच्या पेटीमध्ये अत्यंत सूक्ष्म स्पंदन होऊन जे नाम चालते ते मध्यमेमधे चालते. आपल्या मेंदूमधे जे वाणीचे केंद्र आहे तेवढेच काम करित राहिल्याने मध्यमेत चालणारे नाम डोक्यात चालते असे आतमध्ये समजते. अशा रितीने चाललेले नाम अधिक खोल गेलेले असल्यामुळे शरीराच्या उठणे, बसणे, खाणेपिणे, येणे जाणे वगैरे सामान्य हालचाली होत राहिल्या तरी नामात खंड पडत नाही. अर्थात पुष्कळ बोलल्यावर थकवा येऊन मनुष्य जसा गप्प बसतो त्याप्रमाणे मेंदूतील वाणी केंद्राला थकवा आला की नाम आपोआप थांबते. तरी ज्यावेळी नाम चालू असते त्यावेळी त्याच्या सहवासाचा अनुभव येतो.

## नाम व चार वाणी

१५. मध्यमेतील नामाच्या सहवासाचा एक विलक्षण परिणाम असा दिसतो की अंतःकरणा- मध्ये ढवळाढवळ सुरु होते. वासनांना दाब बसून त्या बंड करून उठतात. आत एक द्वंद्व निर्माण होते. वासना जीवाला एकीकडे खेचते, तर नाम भगवंताकडे खेचते. आपण नाइलाजाने वासनांच्या मागे खेचलो गेलो तरी ज्या वासना नितीधर्माला, माणुसकीला धरून नसतात त्यांची लाज वाटू लागते. आपल्या दोषांची तीव्र जाणीव होऊन आपण खरे चांगले नाही ते मनाला पटते. वासनेशी होणाऱ्या झटापटीत पुष्कळ वेळा हरल्याने भगवंताला शरण गेल्याशिवाय उपाय नाही ही खात्री होते. मी भगवंताचा आहे, मी त्याचे नाम घेतो म्हणून त्याला शोभेल असे वागणे मला जरूर आहे अशी भावना निर्माण झाल्याने कर्तव्याची जागृती येते. जगाला सुधारण्याच्या नादी न लागता आधी स्वतःला सुधारले पाहिजे, हा विचार पक्का होतो, घरादारात, नोकरी- चाकरीत, व्यवहारात व समाजात आपले कर्तव्य मनापासून करून राहिलेला वेळ नामस्मरणात जातो.

१६. मध्यमेमध्ये चालणारे नाम आतल्याआत ऐकण्याचा अभ्यास झाल्यास थोडा थोडा मनाचा लय लागतो. त्याने तात्पुरते का होईना जीवाला विश्रांति मिळते.

१७. मध्यमा वाणीच्या लहरी प्राणरूप असल्याने कमी स्थूल असतात. आणि वासना रुपाने त्या जगात वावरतात. आपण ज्या वासना पोसतो त्यांच्या चांगल्या वाईट लहरी आपल्या भोवती भ्रमत राहतात. आणि त्या व्यक्तींशी त्यांचा संबंध असतो, त्यांच्या मनावर नकळत परिणाम करतात.

१८. त्या लहरी प्राणमय बनल्या की श्वासावर नाम चालते.

१९. पश्यंती जेव्हा देहात केंद्रित होते, तेव्हा ती मध्यमा बनते, मध्यमेमध्ये भाषेचा जन्म होतो. पण तेथे भाषा अव्यक्त, अप्रगट रुपात असते. तिला नादब्रह्म म्हणतात. सप्तस्वरांचे उगम स्थान मध्यमेत असून अतिमधुर संगीत तेथेच प्रथम आकार घेते. अनाहत चक्रापासून आज्ञा चक्रापर्यंत मध्यमेचा विस्तार आहे. मध्यमेत स्थिर झाले की नादब्रह्माचा साक्षात्कार होतो. मध्यमा मेंदूच्या द्वारे काम करते आणि मन तिचे मुख्य क्षेत्र आहे. स्मृती शब्दरूप होणे, कल्पना आकार घेणे, इंद्रिय संवेदनांचा बोध तयार होणे, विकारांची खळबळ होणे, भय वाटणे, चिंता करणे, पूर्वग्रह प्रगटणे इ.आतील व्यापार मध्यमेत चालतात.

२०. तोंड बंद ठेवून जीभ न हालता नाम चालू झाले की वैखरीचा लय मध्यमेत झाला असे समजावे. तेथे अंतर्नाद उत्पन्न होतो. नाम सूक्ष्म बनते. व त्याच्या नादाने मेंदू भरून जातो. तेथे अवधान सहज गुंतून राहाते. आणि जीवनाचे सर्वसाधारण व्यापार व व्यवहार चालू असता आतमधे नामाचे अनुसंधान बरोबर टिकते.

२१. मध्यमेत स्थिर होऊन नामाच्या नादात रमण्यास मात्र प्रयास पडतात.

२२. वैखरीचा मध्यमेत लय झाला की माणूस नामाचा सूक्ष्म नाद ऐकू लागतो. भगवंताच्या मननामध्ये त्याचे मन रमू लागते. तो जरूर तेवढेच बोलतो. ही वितर्कानुगत समाधी होय.

२३. मध्यमेतील नाम चालू असताना गळ्यामधील स्नायूंचे सूक्ष्म स्पंदन चालू असते. मनाचे भटकणे थोडे कमी झाले तरी म्हणण्यासारखा फरक दिसून येत नाही. साधकाने असाच अभ्यास चालू ठेवला तर नाम अधिक खोल जाऊ लागते.

# ३. पश्यंती

> ईश्वराच्या संकल्पाने सृष्टी निर्माण झाली. प्रत्येक वस्तूमधे सूक्ष्म स्पंदरुपाने ॐकार असतो त्याला अनाहत नाद म्हणतात. ते नादब्रह्म होय. माणसाच्या हृदयात ते पश्यंती रुपाने प्रगटते ते केवळ अर्थरूप असते.

> मध्यमेचा अभ्यास नेटाने चालू राहिला म्हणजे नाम यानंतर पश्यंती मध्ये, हृदयस्थानी, अनुसंधान रुपाने चालते.

> नाम होता घेता साधक अनाहतापर्यंत पोहोचला की त्याची वृत्ती पूर्णपणे अंतर्मुख होते.

**श्रीमहाराज**

१. तिसरी वाणी पश्यंती होय. ही पूर्णपणे अर्थरूप आहे. आपल्या प्रधान वासना, आपली ध्येये, मूल्ये व महत्त्वाकांक्षा, आपले शील व चारित्र्य आपली आसक्ति व प्रीति-थोडक्यात म्हणजे आपले व्यक्तीमत्व मनाच्या आणखी खालच्या भागात साठवलेले असते. मनाचा हा भाग अधिक खोल, गुंतागुंतीचा, व्यापक, अधिक स्थिर आणि शक्तिमान असतो. तीव्र भावना किंवा सतत चिंतन या भागात प्रवेश करू शकतात. येथे पश्यंतीचे स्थान आहे. ही केवळ अर्थरूप असल्याने अत्यंत सूक्ष्म असते. याठिकाणी केवळ मेंदूच्या पुढील भागाची चळवळ चालू असते.

२. नामाचा अभ्यास आणखी वाढविला असता त्याच्या पलिकडून येणारे विचार व विकार आपल्या ताब्यात येऊ लागतात. प्रथम ते प्रकट झाल्या बरोबरच त्यांचा मोड केला जातो. आणि नंतर ते प्रकट होण्याच्या अगोदरच त्यांचे उच्चाटन केले जाते. एकीकडे हा अभ्यास आणि दुसरीकडे नामाचे चिंतन केल्याने साधकाचे मन (जागेपणचे, त्याच्या मागचे आणि आणखी त्याच्या भोवतालचे) नामाने इतके भरुन जाते की तेथे दुसऱ्या कशास वाव राहात नाही. या अवस्थेत नामाची धार अखंड सुरु होते.आणि जोपर्यंत धार चालते तोपर्यंत साधक स्वतःला पूर्णपणे विसरून जातो. ही जागेपणाची सुषुप्तीच होय. हिलाच ध्यानावस्था असे म्हणतात. नीतिधर्माचे पथ्य सांभाळून व व मनापासून नामाचा अभ्यास केल्यास दोन तीन वर्षात पश्यंतीमधे नाम घेणे साध्य होईल. परंतु साध्य झालेले टिकविणे फार कठीण असते. साधकाची जशी मनोवृत्ती असेल त्याप्रमाणे त्याला याठिकाणी सुंदर नाद ऐकू येतात, किंवा सुंदर दृष्टांत होतात. किंवा काव्य स्फुरते किंवा रोग बरे करता येतात. किंवा लोक मानू लागतात. अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की शेकडा नव्याण्णव साधक वरीलपैकी कशाच्यातरी मागे लागतात आणि अभ्यासापासून परावृत्त होतात. त्यांची उत्कटता लोप पावते आणि नंतर पुष्कळ प्रयत्न करून देखील नामाची अखंड धारा साधत नाही.

## नाम व चार वाणी

३. या अवस्थेत म्हणजे नामाची अखंड धारा साधली असता साधकाचे मन अति संवेदनशील बनते. त्याला जरा मोकळे सोडले की जगातील वातावरणाचा त्यावर चटदिशी परिणाम घडतो. म्हणून त्याने आपला परमार्थ फार फार गुप्त राखावा. अगदी व्यवहारी माणसासारखे वागावे. लोक नावे ठेवतील तर त्यात आनंद मानावा. लौकिकातील मोठेपण शक्य तितके टाळावे. ध्यानामध्ये नाम अखंड चालू आले म्हणजे त्यातूनच आत्मदर्शनाची एक अभिनव तळमळ निर्माण होऊन साधक भगवंताला पूर्णपणे जातो आणि परमात्मा गुरु रुपाने त्याला आनंदापर्यंत नेऊन पोहचवितो.

४. पश्यंती वाणीची सूक्ष्म अवस्था आहे. पश्यंती वाणी अर्थमय असते. पश्यतीने आपल्याला वस्तुचे व्यक्तीचे अथवा घटनेचे अंतरंग कळते. पश्यंतीमधे अर्थ ध्वनीचे रूप घेतो. ध्वनी म्हणजे शब्दाचे निराकार रूप होय. अर्थाचा संग्रह कारण देहात होतो.

५. पश्यंतीचे नाम विज्ञानमय कोषात अनुसंधान रुपाने चालते. त्या अनुसंधानामधे जीवन सद्गुरुच्या कर्तेपणाने चालते. नामसाधकाचे कर्तेपण गौण व नाम नामधारी असते. त्याच्या हातून सत्कर्मे आपोआप घडतात. त्याचे विकार क्षीणबल होतात. तो संसारात असतो पण संसाराला चिकटलेला नसतो नाम सांभाळून जमेल तेवढा व्यवहार तो नीटपणे करतो. त्याच्या जीवनात हट्टाग्रह आढळत नाही.

६. परा व पश्यंती यांच्यामध्ये वासनेचे स्थान आहे. वृत्ती हवे नको पणाने म्हणजेच आवड, नावड व निवड यांच्या रुपाने पश्यंतीमध्ये राहतात तेथपर्यंत नाम खोल गेले पाहिजे.

७. पश्यंतीवाणी स्मरण रूप आहे, अर्थरूप आहे, मी नाम घेतो असे दर्शनी दिसले तरी मी खरा नाही, भगवंत (अथवा सद्गुरु) खरा आहे. व तोच माझ्याकडून नाम घेववतो. हा अर्थ सतत आतमधे जागा राहतो.

८. पश्यंतीमधे नाम वृत्तीहून सूक्ष्म बनते. वृत्ती नामाला शरण जाते. व स्वत: नामाकार बनते. वृत्तीची निवृत्ती हिच होय.

९. चिंतन, निधीध्यासन आणि प्रेम अशा तीन अवस्थांनी अनुसंधान पक्के होत जाते. चिंतन व निधीध्यासन चालू असताना नाम डोक्यातून हृदयात उतरते. हृदयात उतरले म्हणजे ते पश्यंतीमधे शिरले असे समजावे. पश्यंती वाणी अर्थरुप असून मध्यमेच्या मानाने तिचा विस्तार फार मोठा आहे.

१०. पश्यंतीमधे नामस्मरण सुरु झाले म्हणजे नामाच्या शब्दाकडे लक्ष आपोआप कमी होते. एकीकडे आतमधे नाम चालले आहे अशी स्पष्ट जाणीव वाहून व्यवहारातील ओघाने येणारी कर्मे कर्तव्य बुद्धीने होत राहातात. इतकेच नव्हे तर घडणाऱ्या प्रत्येक घटनेमधे भगवंताची सत्ता कार्य करीत आहे, असे मनापासून वाटते. रोजच्या जीवनात घडणाऱ्या कमी जास्त गोष्टी अशाच चालायच्या, त्यांच्याकडे सर्व लक्ष घालून आपली शक्ति वाया घालवण्यात अर्थ नाही अशी पक्की खात्री आल्याने भगवंताचे अनुसंधान न तुटण्याचे उपाय शोधले जातात. हा अभ्यास चालू झाला म्हणजे नामधारकाला साधक असे म्हणतात. हृदयातील नाम खंड न पडता शक्य तितके अधिक काळ चालावे म्हणून साधक मानस पूजा करतो.

## नाम व चार वाणी

११. पश्यंतीत नाम घेण्याची युक्ती साधली तरी मनातील विकार व भगवंता शिवार इतर विचार सर्वच नाहिसे झालेले नसतात. म्हणून विचार-विकारांना आवरून आपले स्थिर राखून आणि भगवंताच्या मूर्तीला घट्ट धरून व्यवहारातील कर्मे योग्य रितीने करण्यास मोठी सावधानता लागते.

१२. आपले विचार ज्या सूक्ष्म नादात चालतात त्याच नादात पश्यंतीचे नाम चालते आतल्या आत ते ऐकायला येते. त्याबरोबरच तो (म्हणजे देव) आहे, मी असून नसल्यासारखा आहे, अशी सूक्ष्म पण स्पष्ट जाणीव हृदयात वावरते.

१३. पश्यंती वाणीच्या लहरी सूक्ष्म असून त्या केवळ विचाररूप असतात. त्यांच्या भ्रमणाची गती अधिक तीव्र व त्यांची कक्षा अधिक व्यापक असते. प्रबल विचारांचा मनुष्य आपल्या विचार शक्तीने (तोंडाने मौन धारण करून) अनेक व्यक्तीच्या विचारांवर व तद्वारा त्यांच्या जीवनावर मोठाच परिणाम करू शकतो, विचार रूप लहरी एकदा निर्माण झाल्या की जगात पुष्कळ काळ टिकतात. त्या अर्थरूप असल्याने अनेक लोकांना मार्गदर्शन करतात

१४. पश्यंतीतील नाद लहरी मनोमय बनल्या की संकल्प शांत होऊन विकार ताब्यात येतात.

१५. पश्यंती अनाहत आहे.

१६. प्रतिभा अर्थरूप होऊन पश्यंती वाणीच्या रुपाने बुद्धीत उतरते. अनाहत चक्रापर्यंत तिचे क्षेत्र असते. पश्यंतीचा अमुक एका व्यक्तीशी संबंध नसतो. अर्थरूपाने ती सर्व विश्व व्यापून असते विश्व व्यवहारातील सुसूत्रता, व्यवस्था व नियमबद्धता पश्यंतीच्या सामर्थ्याने तगतात आणि तिच्याच माध्यमाने आपल्याला आकलन होतात. पश्यंतीमध्ये भाषेचा भेद नाही, स्थल कालाची बंधने नाहीत.

१७. पश्यंतीमध्ये वाणीच्या लयाच्या पूर्वावस्था व उत्तरावस्था अशा दोन पायऱ्या आहेत. पूर्वावस्थेमधे जागेपणी व्यवहार होत असता आतमधे नाम चालते. वाचन, लेख अथवा संभाषण करताना ते थांबते. खाणेपिणे, शौचादि क्रिया, जाणे येणे, उठणे बसणे, साधे बोलणे इ. हालचाली यंत्रवत होत राहातात. पृष्ठवर्ति मन नित्याचे काम करीत असताना नामाचा प्रवाह भंगत नाही. मधून मधून आपण कोठे आहोत याचा विसर पडतो. ही विचारानुगत समाधी होय. येथे नामाचे किंवा नादाचे अनुसंधान म्हणजे काय याची खरी कल्पना येते.

१८. पश्यंतीच्या लयाच्या उत्तरावस्थेमधे नाम सूक्ष्म शरीर व्यापून टाकते. स्थूल शरीर जड द्रव्याचे असते, तर सूक्ष्म शरीर वासनात्मक असते. वासनामय सूक्ष्म द्रव्याचे ते बनलेले असते. वासना नामाने भरली की भावना प्रदीप्त होतात. व मधून मधून मन अकारण आनंदाने भरू लागते. आनंदाचा आवेग आल्यावर देहाचा विसर पडतो, व भगवंताचे नाम घेत आणि गुण गायन करीत नाचल्याशिवाय चैन पडत नाही. भाव उत्कट होऊन डोळ्याला अश्रू येतात. काही वेळा सुंदर काव्य स्फुरते. नामाच्या या नशेमधे माणसाला बोलू नये असेच वाटते पण भाव कायम टिकत नाही, तो हळूहळू ओसरतो. ही आनंदानुगत समाधी होय. अखेर सद्गुरुच्या कृपेने पश्यंतीचा लय परेमधे होतो.

## नाम व चार वाणी

१९. पश्यंती मधे बाह्य रूपाकडे म्हणजे शब्दाकडे लक्ष नसते. परंतु नामाच्या सूक्ष्म रुपाकडे म्हणजे अर्थाकडे म्हणजे भगवंताच्या अस्तित्वाकडे लक्ष लागून नाम अंतःकरणामधे अधिक खोल शिरते. त्या ठिकाणी सर्व बाजूंनी मन भगवंताला आठवू लागते. विचार, स्मृति, भावना, कल्पना, प्रवृत्ती वगैरे मनाच्या सर्व शक्ती भगवंताला विषय करतात. भक्तीने जे साधायचे ते हेच असून या अवस्थेमधे नाम मनात स्थिर होते.

२०. पश्यंतीमधे नाम ह्दयात स्थिर होते. अंत:करणात नाम स्थिर होणे म्हणजे भगवंताच्या उंबरठ्यात पोहोचणे होय. येथेच निष्ठा निर्माण होते.

२१. वाणीला नाद असतो. तो सूक्ष्म होत जातो. अखेर वाणीची केवळ स्पंदने उरतात. त्या स्पंदनांना पश्यंती म्हणतात. नामाचा नाद पश्यंतीपर्यंत पोहोचला म्हणजे नामाची संगत लाभते. नामाची संगत म्हणजेच सद्‌गुरुची किंवा भगवंताची संगत होय.

## ४.परा

> भगवंताने जो मूळ संकल्प केला तो ॐकार, सृष्टीचे ते आदिबीज आहे. त्याला शब्द ब्रह्म म्हणतात. ती परावाणी असून संतांचे ते नाम होय. येथे नाम आपोआप, अनावर होते.

> अखेर नाम नाभिस्थानी परावाणीने केवळ स्फूर्तिरुपाने चालू लागते. मग बोलणे, देहाची हालचाल, स्थिती, व्याधी किंवा बाह्य परिस्थिती या कशाचाही व्यत्यय न होता नाम अखंड चालू राहाते.

> मौन म्हणजे गप्प बसणे. केवळ वैखरीने गप्प बसणे हे वरवरचे मौन समजावे. मध्यमा आणि पश्यंती या वाणी देखील गप्प बसल्या पाहिजेत. खऱ्या मौनामधे विचार शून्य होते. मन संकल्प शून्य होते. तेव्हा आतमधे विलक्षण शांति पसरते. ती चांदण्यासारखी प्रसन्न असते. तिच्यामधे परावाणी स्फुरणरुपाने अनुभवायला येते. हाच परमार्थ होय. सद्‌गुरुपासून आलेल्या नामाच्या निष्ठापूर्वक अभ्यासाने एक निःशब्द व स्तब्ध अवस्था येते. साधक काही काळ त्या अवस्थेत स्वस्थ राहातो. मग हळूहळू व्यवहार आरंभतो. पण त्याचे मौन भंगत नाही.

श्रीमहाराज

१. परावाणी म्हणजे आत्म स्वरुपाचे शुद्ध स्फुरण, परावाणी वाणी असली तरी ती शब्दांच्या पलिकडे असते. ती ज्ञानमय व शक्ती स्वरूप आहे. तिला शब्द ब्रह्म, ॐकार व आदिबीज म्हणतात. जगदंबा शारदा तीच होय. तुरीया अवस्थेमधे परावाणीची प्रचिती येते. सत्पुरुषाच्या जीवनात ती कायम सतेज राहते.

२. सद्‌गुरुकडून जे नाम आपल्याला मिळते ते अर्थात परावाणीतून येते. त्यामध्ये ज्ञान आणि सामर्थ्य एकवटलेली असतात.

## नाम व चार वाणी

३. आपल्या अंतर्यामी सद्गुरुची म्हणजेच स्वस्वरुपाची जाणीव निर्माण करून ती टिकविणे हे त्या नामाचे प्रधान कार्य असते ते नाम परावाणीच्या रुपाने आपल्या ठिकाणी जसेच्या तसेच वास करते. आपल्या परमार्थाला तेच शक्ति पुरवते. आपल्या अंतरात्म्यामधे बसून ते साधन करवून घेते. असा अनुभव येतो.

४. परावाणी भान स्वरूप आहे. तेथे नाम केवळ स्फुरते. तेथे मीच नसतो, नाम अखंड चालते. हे आनंदमय कोषात चालते

५. परा व पश्यंती यांच्यामधे वासनेचे स्थान आहे.

६. परावाणी मधे वृत्ती उरतच नाही. ती निर्वृत्ती अवस्था असते आणि तीच खरी खरी नामसमाधी होय.

७. परावाणीतून नाम आपोआप स्फुरते व अनाहताचा झंकार चोवीस तास त्याला ऐकू येतो. दिव्यनाद म्हणजेच अनाहत ॐकार अखंडपणे घुमत असतो.

८. परावाणीच्या नाद लहरी फारच सूक्ष्म असतात. अत्यंत निःस्वार्थी आणि साक्षात्कारी पुरुषांच्या हृदयात त्या उत्पन्न होऊन जगामधे पसरतात. परंतु ज्या माणसांच्या मनात त्या ग्रहण करण्याची पात्रता असते, तेवढ्यांनाच त्यांची जाणीव होते.

९. वाणी नादमय असते. आणि नाद बिंदुरुपाने प्रत्येक माणसाच्या बेंबीपाशी राहाते.

१०. नाद लहरी सूक्ष्म बनत बनत बुध्दीत शिरल्या की तिन्ही अवस्थात नाम चालू राहून अखंड अनुसंधान टिकते. आणि अखेर त्यांचे पर्यावसान आत्मसाक्षात्कार होऊन आनंदाचा पूर लोटतो.

११. परमात्म स्वरुपामधील सूक्ष्म चिन्मय स्फुरण परावाणीच्या रूपाने आपल्या अंतर्यामी मूलाधार चक्रात वास करते. परावाणीच्या ठिकाणी शब्द नाहीत, भाषा नाही ती प्रतिभेचे माहेर घर आहे.

१२. परेचा पूर्ण उदय झाला की भगवंताच्या अस्तित्वाचे केवळ भान उरते. अनाहत नादाने अंतर्याम भरुन जाते. शुद्ध चेतनेच्या या नादास ब्रह्मनाद असे म्हणतात. ही अस्मितानुगत समाधी होय. ब्रह्मनाद रसमय असल्याने तो उत्पन्न झाल्यावर साधक त्याच्या मध्ये संपूर्ण बुडून जातो. त्याला स्वतःचे व जगाचे भान नसते. तेथे बोलण्याचे भान कोठे असणार?

१३. तुरीया अवस्थेमधे मी नाम घेतो हे शिल्लक न राहता नुसते अखंड नाम मात्र चालू राहते.

१४. भगवंताचे जे स्फुरण आहे त्यास ॐकार म्हणतात ओम म्हणजे भगवंताची चित्शक्ति, त्यासच शब्दब्रह्म म्हणतात ती परावाणी होय. तिला रंग, रूप, आकार, विकार इत्यादि नाहीत ती नाभी कमलात अत्यंत सूक्ष्म रुपाने स्पंदन पावते. ती स्पंदने जेव्हा प्राणवायूच्या प्रवाहाशी समरस होऊन शरीराला व्यापतात तेव्हा त्यास नादब्रह्म म्हणतात. सचेतन व अचेतन अशा प्रत्येक वस्तूला धारण करणारे चित्शक्तीचे जे रूप त्यास नादब्रह्म असे म्हणतात. गुरुने दिलेला जो मंत्र असतो त्याच्या जपाने प्रथम शरीरातील नादब्रह्म प्रचितीला येते. शरीरातील सर्व घटक-विशेषतः रक्तपेशी गुरूने दिलेल्या नामाने भरून जातात. त्यानंतर तोच नाम नाद सर्व दिशांना भरुन असलेला साक्षात ऐकायला येतो. त्यास अनाहत नाद म्हणतात.

**नारायण जोशी श्रीसमाधि मंदिर, गोंदवले**



स्मृती सुमने

**श्रीराम समर्थ**

**८ फेब्रुवारी– परमपूज्य बाबा बेलसरे यांचा जन्मदिवस! त्यानिमित्ताने त्यांच्या चरणी स्मृतीसुमने**

# मी (न) पाहिलेले पू. बाबा

मुख्य सच्छिष्याचे लक्षण । सद्गुरू वचनी विश्वास पूर्ण ।
अनन्य भावे शरण या नाव सच्छिष्य ।।

दासबोधातील द.५ स.३ मधील ही ओवी पू. बाबांचे यथार्थ वर्णन करते असं वाटतं. 'वाटतं' म्हणण्याचं कारण मी त्यांना प्रत्यक्ष पाहिलं नाही, पण ते मला भेटत गेले ते त्यांच्या निरुपणातून, पुस्तकातून, लेखातून वा अनेक जणांच्या आठवणीतून! त्यांना एकदाच भेटलेल्या व्यक्तीपासून ते नेहमी भेटणारे, सहवासात असणारे, त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागणारे, त्यांचं मार्गदर्शन घेणारे, त्यांची फक्त निरुपण ऐकणारे, त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास करणारे, त्यांच्या अति निकट असणारे साधक, प्रापंचिक, विद्यार्थी आणि त्यांचे चिरंजीव आ. श्रीपाद दादा या सर्वांनी त्यांच्या आठवणी आजही एखाद्या अत्यंत आवडत्या वस्तू प्रमाणे मनात जपल्या आहेत. त्यावरून ही ओवी म्हणजे त्यांचच वर्णन असावं असं वाटलं.

१९३१ साली श्रीमहाराजांची भेट झाली आणि बाबांचे जीवन आमूलाग्र बदलू लागले. ज्ञानेश्वरीत बाराव्या अध्यायात पावसाळ्यात नदीच पात्र जसं वाढत जात तशी सद्भक्ताची श्रध्दा वाढत जाते म्हटलं आहे, अगदीं तशीच श्रध्दा पू. बाबांची श्रीमहाराजांच्या सहवासात आणि कृपा वर्षावात अखंड वाढतच राहिली.

साधन आणि सद्गुरू आज्ञापालन हेचं त्याचं जीवनाचं मुख्य सूत्र असल्याचं जाणवतं. श्रीमहाराजांचं विचारधन अभ्यासून, आचारून आणि केवळ आज्ञा म्हणून निरूपणातुन त्यांनी अनेकांना अध्यात्माचा खरा मार्ग दाखवला. तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक असून सुद्धा कोरडेपणाने सिद्धांत आणि तत्त्वज्ञान न सांगता संतांचे तत्त्वज्ञान जिथे जीवनातून दिसते त्याचाच संदर्भ ते कायम देत असत. त्यामुळें सध्याच्या शिक्षण पद्धतीत वाढलेल्या श्रोत्यांच्या मनाला ते लगेच पटते. उदाहरणादाखल..

१. प्रवचनात एकदा दास्यभक्ती बद्दल सांगताना त्यांनी वडिलांच्या कोर्टातील एक प्रसंग सांगितला. शिपाई एका कैद्याला धरून उभा होता आणि कैदी त्याला सांगतं होता की मला शौचाला जायचं आहे जरा सोडा. पण शिपाई काही सोडत नव्हता. बाबा म्हणाले मी १४/१५ वर्षाचा असेन तेंव्हा! त्या शिपायाला म्हटलं मी, ''का सोडत नाही?'' तेंव्हा

शिपाई म्हणाला, "मी याचं सगळं ऐकलं तर हा कैदी कसला! मी शिपाई आहे. हा कैदी याने माझं ऐकायला हवं." हा साधा प्रसंग सांगून म्हणाले, 'स्वतःची इच्छा नाहीशी करणे' म्हणजे हे आहे. जो भगवंताचा दास असतो तो स्वतःच्या इच्छेने जगत नाही."

२. १९९७ मध्ये mobile handset जेंव्हा बाजारात आला तेंव्हा किमंत फार होती, काही लाख आणि नेमका एकाचा तो लोकल मध्ये हरवला तेंव्हा ती व्यक्ती अस्वस्थ झाली आणि बाबांकडे येऊन व्यथा मांडली. तेंव्हा बाबांनी प्रेमानें सांगितलं, "अहो लोकांची राज्य जातात. हैदराबादचा निजाम, त्याच राज्य गेलं. काय एवढ्याश्या गोष्टीने आपण अस्वस्थ व्हावं?"

श्रीमहाराजांप्रमाणे पू. बाबाही आलेल्या माणसाला सहज धीर देत असत आणि त्याचं मन प्रसन्न करून पाठवत. उदाहरणं अशी दिली की ऐकणाऱ्याच्या लक्षात ही राहत आणि distance between actual and ideal किती तेही समजत असे.

श्री. श्रीपाद दादांनी एके ठिकाणी लिहिलं आहे की, 'पू. बाबांनी शास्त्रीय पद्धत तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला वापरली आणि ज्ञानाला निश्चिती येण्यासाठी सूक्ष्म विचार आत्मसात केला. त्यामुळें त्यांच्या ज्ञानाला एक निश्चिती होती; त्यांच्या विचारात स्पष्टपणा होता.' असं वाटतं की या जोडीला वेदांतातील अनेक गूढ गोष्टी श्रीमहाराजांनी त्यांना समजावून दिल्या व यासोबत परमार्थातील दिव्य अनुभवाच्या श्रीमंतीने त्यांचं ज्ञान हे केवळ intellectual gymnastics न रहाता त्याला निश्चिती बरोबरच व्यापकता आणि खोली आली.

स्त्री -पुरुष, विद्वान, उच्च शिक्षित, सामान्य माणसं, इतर संप्रदायातील साधक, इतर भाषिक, परदेशी साधक अश्या सर्वांनाच ते पूज्य होतें. कारणं अश्या प्रत्येकाला त्याच्या पात्रतेप्रमाणे अध्यात्म मार्गात त्याचं पाऊल पुढे कसं पडेल याचं मार्गदर्शन केलच, पण त्यासाठी प्रत्येकाला कायम आधारही दिला. हे सुद्धा त्यांचं 'आज्ञापालन'च होतं कारण १९६७ साली पू. तात्यासाहेब असतानाच्या शेवटच्या भेटीत श्रीमहाराजांनी त्यांना सर्वांना नामाला लावावं आणि सर्वांना धीर द्यावा असं सांगितलं होतं.

निरूपणं, पुस्तकं, प्रत्यक्ष संवाद, पत्र आणि फोन या सगळ्याच माध्यमातून हे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न केला. अश्या अनेकजणांनी मला त्यांच्याकडे असलेल्या आठवणी, त्यांना आलेले अनुभव परत परत आनंदाने सांगीतले. उदा. दाखल

१. श्रीमहाराजांचेच भक्त डॉ. वा. रा. अंतरकर स्वतः मला म्हणाले,'अरे, मी अनेक विद्वानांचे ग्रंथ नुसते वाचले नाहीत तर अभ्यासले आहेत. पण पू. बाबांसारखा appropriate शब्द प्रयोग करणारा सिद्ध हस्त माझ्या पाहण्यात नाही आणि श्रीमहाराजांसारखी गोड प्रेमानें समजावणारी भाषा इतर कोणाजवळ नाही.

२. ज्येष्ठ साहित्यिक कै. यशवंत पाठक मला म्हणाले, "आनंद साधना आणि श्रीमहाराजांचे चरित्र ही दोन मॉडेल पुस्तकं आहेत." पुढे म्हणाले, मी बाबांना विचारले, "तुमच्या घरात सारखा लोकल ट्रेनचा खडखडाट मोठ्या आवाजात ऐकू येतो, आपलं साधन कसं झालं इथे?" तेंव्हा बाबा हसून म्हणाले, "त्यांच्या गाडया सुरू झाल्या की आमची गाडी पण सुरू होते."

## मी (न) पाहिलेले पू. बाबा

अफाट स्मरणशक्ती आणि एकाग्रता यांचं वरदान त्यांना होतं. एकानी सांगितलं, पू. बाबा स्वतःच त्यांना एकदा म्हणाले दोन तीनदा नुसती गीता (७०० श्लोक) वाचली आणि पाठच झाली. तर डोंबिवलीत राहणाऱ्या एकानं सांगीतलं मी बोरिवलीत काही कामानिमित्त गेलो होतो तेंव्हा परत येताना बरेचं दिवसात बाबाना पाहिलं नाही म्हणून भेटायला गेलो दुपारी २ वाजता! ते काहीतरी लिहिण्यात गर्क होते. त्यामुळे संकोच झाला की त्यांना disturb करतोय म्हणून, पण तसं अजिबात जाणवू न देता पू. बाबा प्रेमाने थोडयावेळ त्यांच्याशी बोलले आणि परत आपल्या विषयात क्षणात मग्न झाले.

डोंबिवलीतील भगवान रमण महर्षींचे भक्त, हजारे काका मला म्हणाले, ''मला बाबांना एकट्यानेच भेटायचे म्हणून मालाडला गेलो तेंव्हा बाबा एकटेच बसलेले दिसले मी वीस एक मिनिटे बोललो असेन. बोलताना मी एकटाच आहे असं वाटतं होतं पण तिथून उठलो तेंव्हा आजूबाजूला बरीच मंडळी पाहून मला आश्चर्य वाटलं. असं वाटलं की आपल्याला बोलताना कसं कळलं नाही.

श्रीमहाराजांच्या भक्तांबद्दल त्यांना अतीव आदर आणि प्रेम होते असे डॉ. अंकलीकर यांच्या नातीने म्हणजे आ.अलकाताई मुतालिक यांनी सांगितले. काही प्रपंचिक अडचणी मध्ये द्विधा मनस्थिती झालेल्या एकाने मला सांगितले मित्राच्या सांगण्यावरून मी बाबांना एकदाच भेटलो पण तो अनुभव विलक्षण होता. मालाडला बाबांना अनेक जण भेटत होते त्यातच मी भेटलो, गर्दी असूनही त्यांच्या समोर बसल्यानंतर असं जाणवलं की माझं संपूर्ण मन त्यांना स्पष्ट दिसत आहे. आणि इतक्या प्रेमाने त्यांनी सांगितलं की निर्णय माझ्या मनाविरुद्ध असूनही निघताना मला वाईट न वाटता मन प्रसन्न होतं.

श्रीमहाराजांचे ''सर्वांना नामाला लावावे व सर्वांना धीर द्यावा'' हे सांगणे पू.बाबांनी अगदी शेवट पर्यन्त ऐकले. १९९८ च्या चैतन्य स्मरणिकेतच ताई शिरवळकर यांनी आठवण सांगितली आहे. गोंदवले येथील १९९७ पुण्यतिथी उत्सव झाल्यावर परत येताना २७ डिसेंबर १९९७ (म्हणजे देह ठेवण्याआधी ३ दिवस) श्री. सबनीस यांच्याकडे त्यांची भेट झाली तेंव्हा स्वतः अत्यवस्थ असतानाही, ताई शिरवळकर यांची मुलगी आणि जावई अकाली गेल्याने अस्वस्थ असलेल्या ताईचे गोड बोलून समाधान केले. त्यांनी श्रीमहाराजांचे सांगणे शेवटपर्यंत, म्हणजे देह ठेवेपर्यंत ऐकले हे सुद्धा म्हणणे बरोबर होणार नाहीच कारणं आजही माझ्यासारख्याला पुस्तक आणि निरूपण यातून ते कायम आधारच देतात आणि नामाकडे वळवतात.

डॉ. अंतरकर मलाच म्हणाले की साधना, विद्वत्ता त्यांच्या कडे होतीच, पण अत्यंत दुर्मीळ गोष्ट म्हणजे intellectual honesty बाबांकडे होती. एकदा बाबांच्या निरूपणात संस्कृत व्याकरण दृष्टीने एक चूक दिसली म्हणून निरूपण संपल्यानंतर मी (डॉ.अंतरकर) बाबांना ते लगेच सांगितलें. तेंव्हा बाबांनी क्षणभर डोळे मिटून विचार केला आणि लगेच म्हणाले, ''बाबुराव तुम्हीं म्हणता तेच बरोबर! माझं चुकलं.'' विद्वानाकडे इतक्या लगेच चूक कबूल करण हा गुण दुर्मिळच असतो असं त्यावर अंतरकर मला म्हणाले.

उत्तम लेखक, उत्तम वक्ता, उत्तम नेता यांच्याकडे असणारी सगळी गुणसंपदा बाबांकडे होती पण ती सगळीच्या सगळी त्यांनी श्रीमहाराजांना आवडेल अश्याच गोष्टीवर खर्च केली. हे पाहून

स्मृती सुमने

## मी (न) पाहिलेले पू. बाबा

१३ व्या अध्यायातील ज्ञानेश्वर महाराजांनी वर्णन केलं आहे 'आचार्योपासना' इथे दिसते. गंगा समुद्रास मिळताना संपूर्ण पाण्यासकट समर्पण होते तस बाबांनी जे जे आपल्याकडे आहे ते समर्पणाचा पूर्ण प्रयत्न केला असच वाटतं.

मालाड मधील एका साधकाने एकदा सांगीतलं ते मला फार आवडलं. ते म्हणाले श्रीमहाराज सद्गुरू म्हणून भेटणं हे थोर भाग्याचं खरं! पण श्रीब्रह्मानंद महाराज, पू. बाबा यांसारखे अध्यात्मिक सामर्थ्यवान शिष्य स्वतःच महत्व जराही वाढणार नाही याची काळजी घेतात ते पाहून शिष्यही त्यांना थोरच लाभले. आपल्याकडे असलेलं सामर्थ्य कुठेही प्रकट होणार नाही ह्याचेही सामर्थ्य बाबांनी बाळगलं याचं कारणही श्रीमहाराजांनी सांगितलेला अमानित्वाचा अभ्यास. एकदा गोंदवले इथे बाबांबरोबरच पंक्तीला जेवायला बसलेल्या मोठ्या साधकाने सांगितलं, ''जेवणं झाल्यावर मी बाबांची पत्रावळ उचलू लागलो तर लगेच बाबा म्हणले नको साधकाचा अहंकार वाढणं आणि बुवाबाजी अश्याच गोष्टीतून चालू होते.''

डॉ. प्र. म. उपाध्ये सर यांच्या लेखात आहे की त्यांनी बाबांना काही प्रश्न विचारले त्याची उत्तर पू. बाबांनी त्यांचेंच गुरु गुरूदेव रानडे यांच्या वचनांचा आधार घेऊन दिली. बाबांच्या ज्ञानाचा आणि स्मरणशक्तीचा त्यांना अचंबा वाटला. चरीत्र लिहीत असताना माहिति साठवताना त्यांना कष्ट झालेच पण त्यामधेही श्रीमहाराजांच प्रेम किती असावं ते एका प्रसंगातून लक्षांत येतं. एका कीर्तनकाराकडे श्रीमहाराज आणि वलव्हणकर शास्त्री यांचा जो प्रसिद्ध संवाद घडला त्याचा लिखित वृत्तांत होता, ते लिखाण तो कीर्तनकार सहज देईना म्हणून बाबांनी त्याच्या पायावर डोकं ठेवून विनवणी केली की काय पाहिजे ते सांगा पण ते लिहिलेले मला द्या.

गोंदवले इथे अनेक वर्षे राहून साधना करणाऱ्या एका साधकाने मला सांगितले बाबांनी पूर्वी एकदा त्याला सांगितलें होतें की गेल्या २७ वर्षात पहाटे ४ ते ६ ही साधनेची माझी वेळ चुकली नाही. पू. बाबांनीच श्रीमहाराजांबद्दल म्हटलं होतं, गोंदवले इथे आजही अनंताचा साक्षात्कार पाहायला मिळतो, पण पू. बाबांची आध्यात्मिक उंची, अनुभवाची श्रीमंती, असाधारण साधना, प्रचंड विद्वत्ता, सद्गुरुंचे अलोट प्रेम, इतरांना आधार आणि प्रेम दिल्याने प्राप्त झालेलं जनप्रियत्व, अफाट स्मरणशक्ति, विपुल ग्रंथ लेखन हे पाहून आजही असं वाटतं की ज्या सत्शिष्याने श्रीमहाराजांना अंत:करणात घट्ट धरलं तिथेही अनंताचाच साक्षात्कार दिसतो. वास्तविक आ. श्रीपाद दादा, त्यांचे कुटुंबीय आणि आ. म. वि.केळकर यांनी लिहिलेले पू.बाबांबद्दल सांगणारे लेख हे प्रसिद्ध झालेले असताना, मित्राच्या सांगण्यावरून हे लिहिण्याचं मी धाडस करणं म्हणजे कसं आहे, तर या बाबतीत बाबाच जे एक वाक्य नेहमी उद्दृत करत ते आठवलं.

Fools rush in where Angels fear to tread.

तरीही सत्पुरूषाचे पाय चाफा, मोगऱ्याला असणारा सुगंध सौंदर्य नाही म्हणून तगरीचं फूल काही दूर करणार नाहीत म्हणून ही शब्द सुमनं त्यांच्याच चरणावर वाहतो आणि श्रीमहाराजांच्या चरणाजवळ मी कायम रहावं अशी प्रार्थना करतो.

**श्रीपाद दांडेकर, डोंबिवली**






# कै.रविंद्र ओक

माझे मित्र कै.रविंद्र ओक पुण्यामध्ये स्थायिक होते. गोंदवल्यामध्ये महाराजांच्या वस्त्र विभागात सेवेसाठी माझ्या बरोबर काम करत होते. त्या अगोदर ते महाराष्ट्र बँकेत मॅनेजरच्या पोस्ट वर होते. स्वभावाने नम्र, संकोची आणि मितभाषी. महाराजांवर अतोनात प्रेम आणि श्रद्धा. पाणी पिणं सुद्धा महाराजांना सांगून करायचे. शरीर खूप विकलांग.

दोन मुले. मुलगा आणि सून नीट वागवत नसल्यामुळे थोडे मानसिक असंतुलन झालेले. त्यामुळे बऱ्याचदा ते गोंदवल्याला असायचे. इथे आनंदात राहायचे. पण पुण्याला घरी निघाले की उदास व्हायचे. त्यांना एक लग्न झालेली मुलगी होती. ऑस्ट्रेलिया (सिडनी) मध्ये स्थायिक झालेली. तिच्यावर खूप माया होती. तीही रोज काळजीने त्यांना फोन करायची.

अशा परिस्थितीत त्यांना नेहमी असं वाटायचं की आपला अंतकाळ एक तर गोंदवल्याला, महाराजांच्या सानिध्यात व्हावा किंवा मुलीकडे ऑस्ट्रेलिया मध्ये व्हावा. ते रोज रात्रीच्या प्रसादा नंतर ही त्यांची विलक्षण ईच्छा महाराजांच्या कानांवर न चुकता घालायचे. महाराज ऐकणारच ह्या श्रद्धेने. आणि अहो आश्चर्यम! त्यांच्या निष्ठेची महाराजांनी त्यांना पावती दिली. अखेर त्यांचा अंतकाळ हा त्यांची कन्या ममता हिच्याकडे सिडनी, ऑस्ट्रेलिया इथे झाला. विकलांग असून सुद्धा अंतकाळी कसलाही शारीरिक किंवा मानसिक त्रास झाला नाही. ही महाराजांची किमया. अंतकाळानंतर कन्या आणि जावई यांनी त्यांच्या सर्व क्रिया तिकडेच सिडनी मध्येच हिंदू धर्माच्या रितीरीवाजां प्रमाणे केल्या. आम्ही सुद्धा इथे त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जप करून तो महाराजांना अर्पण केला. अशा तऱ्हेने त्यांना महाराजांनी उत्तम गती दिली.

**श्री बाळकृष्ण भालेराव**

काव्य सुमने

## दयासिंधु

दयासिंधु श्री सदगुरू अमुचे
म्हणुनी पायी ठाव आम्हां
कायावाचामनें सारखी
अपराधांची रास पुन्हा ।।१।।

वरुन पायऱ्या खाली उतरता
दीन दयाळा दया करा
असे नेहमी म्हणुनी विनविती
प्रभो लेकरा क्षमा करा ।।२।।

करुणा सागर गुरूदेव जे
'या बरं बाळा' म्हणे पुन्हा
आम्ही मात्र कोडगे विनविती
क्षमा करावी पुन्हा पुन्हा ।।३।।

पुरे अता हे रोज बहाणे
नित्य निरंतर नाम स्मरू
शरण जाउनी गुरुरायाला
अर्पण सर्वस्वास करू ।।४।।

**स्वानंद**





# कै. शरद पंढरीनाथ खोत

।। प्रेमात राम रमतो, प्रेमाला मोल ना जगामाजी ।
हाचि निरोप गुरुंचा गुरुरायाला तहान प्रेमाची ।।

तुम्ही प्रेम द्या ... तुम्हाला प्रेम आपोआप मिळेल... या श्री महाराजांच्या वचनावर प्रेरीत, जागृत असलेले व नामावर दृढ निष्ठा असलेले असे निष्ठावान साधक कै. शरद पंढरीनाथ खोत म्हणजे आमचे बाबा हे तीन वर्षा पूर्वी १७ सप्टेंबर २०२०, सर्वपित्री अमावास्या या दिवशी आम्हांला सोडून श्री चरणी विलीन झाले. नाशिक जिल्ह्यातील विंचुर या ग्रामीण भागात बाबांचा जन्म झाला. शिक्षणा नंतर नोकरी निमित्ताने महाराष्ट्राच्या अनेक भागत फिरुन सिटी सर्वे या सरकारी खात्यात नोकरी पत्करुन नाशिक येथे स्थायिक झाले. अत्यंत कष्टमय व गरिबीत पारिवारीक जबाबदारी पार पाडत असतांना साधारण चाळीस वर्षापूर्वी सद्गुरु भेटीचा ध्यास बाबांना लागला.

श्री मुरलीधराची सेवा व श्री गुरुचरित्र पारायणाचे फल स्वरुप श्री महाराज सद्गुरु म्हणुन बाबांना लाभले व आनंदाच्या शिखरावर पोहचले. मोजक्या साधक मित्रांच्या मदतीने श्री महाराजांच्या उपासनेचे बीज नाशिक येथे रोवले व नामसाधनेला सुरवात केली. श्री महाराजांच्या सेवेचा वसा घेऊन श्री समाधी स्थान गोंदवले व नाशिक येथे तन मन धनाने आपले जीवन कार्य समर्पित केले. श्री महाराजांच्या वचनांची, शिकवणीची संस्कार शिदोरी संपूर्ण परिवाराला दिली व अनुग्रहीत केले.

परिवारा बद्दल सांगायचे तर श्री कृपेने अनेक सुख दु:ख झेलुन कठीण प्रसंग पार केले. ते नेहमी म्हणायचे सगळ्या गोष्टी श्री महाराजांना सांगुन करायच्या, जे घडेल..होईल ती महाराजांची ईच्छा असे सांगत नेहमी मार्गदर्शन केले. आमचे बाबा एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. टापटीप रहाणी, ऊत्कृष्ट वक्तृत्त्व, गायन, वाचन, राजकारणतील घडामोडी इ.गोष्टी आवडीने जोपासत असे. घरातील कुळधर्म कुळाचार, सणवार प्रसंगानुरुप शुभकार्य, उपासना या मधे हिरीरीने .. ऊत्साहाने भाग घेत असे.

बाबांची नामसाधना इतकी दृढ होती की श्री महाराजांच्या वचनाप्रमाणे उठता बसता व देह व्यापारात सतत नामजपात असायचे व त्याचा प्रत्यय म्हणजे श्री ब्रह्मानंद महाराजांच्या पुण्यस्मरण दिनी बाबांचा अंतकाळ साधणे हे श्री कृपा व साधनेचे लक्षण आहे असे म्हणणे चुकीचे होणार नाही. श्री सेवेत असतांना क्षणोक्षणी आठवणी वेचत गोंदवले व नाशिक येथील साधक व खोत परिवार स्मरण पूर्वक कार्यात उजाळा देत असतात. या पुढे श्री महाराजांच्या कृपेने व बाबांच्या आशिर्वादाने आम्ही खोत परिवार या भवसागरात तरुन जाऊ यात शंका नाही.

।। श्रीराम ।।

**खोत परिवार**



# कै. पांडुरंग सखाराम तारगांवकर,
# कै. सुशीला पांडुरंग तारगांवकर

स्मृती सुमने

।। अमानित्वम अदम्भीत्वमहिंसानातींरार्जवं।।

गीतेचा हा श्लोक माझ्या आई बाबांना पुरेपूर लागू होतो. गोंदवले संस्थांनातर्फे वेळोवेळी प्रकाशित होणाऱ्या स्मरणिकेमध्यें श्री महाराजांच्या भक्तांचे स्मरण नेहमी होत असते. सन २०१३ च्या शताब्दी अंकात माझ्या आईबाबांबद्दल मी लिहावे अशी बापूकाकांची (श्री. दामले) अतीव इच्छा होती. मी त्यांना ज्या ज्या वेळी भेटत असे, तेंव्हा ते भरभरुन आईबाबांबद्दल बोलत, अगदी कृतद्यतेने! 'तुझ्या बाबांनी संस्थानाचे एवढे मोठे काम केले आहे. अगदी संस्थानाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहावे असं'. बाबा आणि ते जेंव्हा भेटायचे तेंव्हाही ते हे वाक्य पहिल्याने बोलत. 'साहेब' अशी सुरुवात करत, मग बाबा त्यांना म्हणत, 'बापुकाका, आपले साहेब म्हणजे महाराज. मी त्यांचा दीनदीस' आणि मग दोघे खळाळून हसत!

बापूकाकांच्या आग्रहाने मी २०१३ साली टिपण काढले पण दुर्दैवाने बापुकाका आजारी पडले आणि ही गोष्ट तशीच राहून गेली.

अमानित्व हा आईबाबांचा मोठा गुण असल्याने आपल्या कार्याची कुठेही वाच्यता करायची नाही अशी त्यांची इच्छा होती, तर बापूकाकांना मात्र त्यांचं काम सर्वांच्या नजरेसमोर आणावं ही इच्छा होती. तसं पाहिलं तर बाबांचा गोंदवल्याशी संपर्क साधारणपणे सन १९३१ च्या दरम्यान आला, ते ८/९ वर्षांचे असल्यापासून माझी आजी त्यांना घेऊन येत असे. नोकरी निमित्ताने रेव्हेन्यू डिपार्टमेंट मध्ये दाखल झाल्यावर योगायोगाने त्यांचे बरेचसे पोस्टिंग वडूज, खटाव, दहिवडी, फलटण, पंढरपूर इथे राहिल्याने, गोंदवल्याशी नाते घट्ट होत गेले. आणि अशाच एका शुभ समयी त्यांची गाठ श्री तात्यासाहेबांबरोबर (केतकर) पडली. त्यांनी अत्यंत प्रेमाने चौकशी करून बाबांच्या पाठीवरून हात फिरवला. तो संकेत होता बाबांच्या हातून संस्थानाची अविस्मरणीय सेवा घडण्याचा!

सन १९७५ साली बापुकाका संस्थानाच्या विश्वस्त पदावर रुजू झाले आणि योगायोगाने माझे बाबा दहिवडीला मामलेदार म्हणून आले. एका महान कार्याची ती नांदी होती असे बापुकाका नेहमी म्हणत. विषय मोठा नाजूक, गुंतागुंतीचा आणि जटिल! श्री. महाराजांच्या मृत्यूनंतर बराच काळ लोटल्याने महाराजांच्या असलेल्या जमिनी, मंदिरे यामध्ये फेरफार झालेले होते. शिवाय रेकॉर्डस बऱ्याच ठिकाणी पसरलेले असल्याने काम कठीण होते. आमचे बिऱ्हाड साताऱ्यात असल्याने बापुकाका, गाडगीळ काका, खरेकाका वारंवार साताऱ्यात या कामासाठी येत.

बाबा मामलेदार असल्याने सर्व गोष्टी सुरळीत पार पडत होत्या, अखेर श्री महाराजांनी केलेल्या तरतुदीनुसार पुन्हा संस्थांनाच्या ताब्यात सर्व जमिनी आणि मंदिरे पुन्हा आली! शिवाय तो आणीबाणीचा भयानक कालखंड होता, पण महाराजांनी बाबांना अगदी फुलासारखे जपले!

मे महिन्यात गाडगीळ काका आम्हाला आग्रहाने गोंदवल्यात ठेऊन घेत. चैतन्य इमारतीत जिन्याच्या एका बाजूला आम्ही आणि एका बाजूला गोपालस्वामी! शिवाय बाबा बेलसरे पण पूर्ण मे महिना असतंच! मोठे मंतरलेले दिवस होते ते!

## कै. पांडुरंग सखाराम तारगांवकर,
## कै. सुशीला पांडुरंग तारगांवकर.

रेव्हेन्यू सारख्या खात्यात अत्यंत निस्पृहपणे काम हे केवळ महाराजांच्या श्रद्धेमुळे असे ते नेहमी म्हणत. त्यांच्या कृपेने शेवटी डेप्युटी कलेक्टर म्हणून ते रिटायर झाले. दिवस-रात्र ऑफीस मध्ये मीटिंग असली तरी ते केवळ दूध केळी खाऊन राहात. रिटायर झाल्यावर पेन्शनची पहिली मनीऑर्डर गोंदवल्यात असे.

आई बाबांचा अंतकाळ तर महाराजांनी अत्यंत दिव्य साक्षीत्वानं साधला. खूप अनुभव आणि आठवणी! अगदी पुस्तक लिहून होईल अशा! पण लेखन सीमा आणि आईबाबांना रुचणारे नाहीच. केवळ बापू काकांच्या आग्रहास्तव ही आठवण श्री महाराजांच्या चरणी अर्पण.

**सौ. शोभा दत्तात्रय छत्रे, कोल्हापूर.**



## कै. मनोहर रामचंद्र घोडके

आमचे तीर्थरूप वडील व श्री महाराजांचे निस्सीम भक्त श्री मनोहर रामचंद्र घोडके दि. ६ ऑक्टोबर २०२१ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी रामचरणी विलीन झाले. ते नोकरीत असताना पोलीस खात्यात PSI ह्या पदावर कार्यरत होते. त्यांनी आयुष्यभर श्री महाराजांची रविवारची आरती, गुरुपौर्णिमा जन्मोत्सव व पुण्यतिथी उत्सव कधीच चुकवला नाही. एवढेच नव्हे तर त्यामध्ये उत्साहाने व हिरीने त्यांचा सहभाग असायचा. विशेषतः गोंदवल्याचे ऑफिस ग्रंथालय स्वयंपाकघर व चहाच्या सेवा मंडळात त्यांनी भक्तीभावाने सेवा केली. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत मनमिळाऊ व सर्वसमावेशक होते. आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाने त्यांनी अनेक जणांना श्री महाराजांकडे व रामनामाकडे वळवले.



**श्री प्रदीप घोडके / श्री दिपक घोडके**



# अखंड कृपेचा वारसा

माझे वडील (कै) प्रा. प्र. म. उपाध्ये (तत्कालीन संस्कृत विभाग प्रमुख, पार्ले कॉलेज) हे पू. बाबा बेलसरे यांचे सिद्धार्थ कॉलेजमधील विद्यार्थी! आम्ही वडिलांना 'अण्णा' म्हणायचो. अण्णांची घरची परिस्थिती सर्वच दृष्टीने अतिशय प्रतिकूल. सर्वच कुटुंब अण्णांवर अवलंबून. शिक्षणासाठी अण्णा उरणहून मुंबईला आले होते. मुंबईत आधार असा कोणाचा नाही. कित्येक वेळेस २ ते ३ दिवस उपाशी पोटी रहावे लागे. तरीही ज्ञानार्जनासाठी कोणतेही कष्ट करण्याची तयारी असणाऱ्या या विद्यार्थ्यावर पू. बाबांचे विशेष प्रेम होते.

अण्णा बी.ए मधे असताना 'तत्वज्ञान' या विषयाकरिता पू. गुरुदेव रानडे यांचे पुस्तक अभ्यासासाठी होते. त्यातील काही शंका अण्णांनी पू. बाबांना विचारल्या. त्यावर पू. बाबा म्हणाले, अरे या पुस्तकाचे लेखक (म्हणजे पू. गुरुदेव रानडे) हे स्वतः एक सत्पुरुष आहेत. तू त्यांनाच भेटून तुझ्या शंकाच निरसन करून घे. एका सत्पुरुषाची भेट होईल आणि तुझही काम होईल. पू. गुरुदेव हे निम्बाळ कर्नाटक येथे राहत. पण योगायोगाने ते मुंबईला येणार होते. पू. बाबांच्या सांगण्यानुसार अण्णा त्यांना भेटायला गेले आणि.... ध्यानीमनी नसताना पू. गुरुदेवांनी पहिल्याच भेटीत अण्णांना अनुग्रह दिला. अशा तऱ्हेने अण्णांच्या पारमार्थिक प्रवासाचा पहिला टप्पा पू. बाबांमुळे सुरु झाला. अण्णांचं जीवन कृतार्थ झालं. आपण पू. गुरुदेव रानडे यांचे शिष्य झालो याचं आनंद अण्णांना झालाच पण तितकाच आनंद पू. बाबांना झाला.

अण्णा एम् ए च्या परीक्षेला बसले असता एका पेपरच्या वेळी त्यांना प्रचंड ताप आला होता. पोटात अन्नाचा कण नाही ना औषधपाणी त्यांना भोवळ आली. थोड्यावेळाने शुद्धीवर आले खरे, पण त्यांना त्या विषयाच्या पेपरचे एक अक्षरही आठवेना पूर्ण 'blank'! त्यांनी त्या असहाय अगतिक स्थितीत पू. गुरुदेवांचे आर्ततेने स्मरण केले. आणि चमत्कार झाल्यासारखे सर्व प्रश्नांची उत्तरे भराभर मिळत गेली. अण्णा लिहित गेले. पेपर वेळेत पूर्ण झाला. इतकच नव्हे तर त्या विषयाच प्रथम पारितोषिक ('झाला वेदांत' पुरस्कार) अण्णांना मिळालं. अण्णांच्या या अनुभवामुळे पू. बाबा अत्यंत आनंदित झाले, आपल्या लाडक्या विद्यार्थ्याची हि गोष्ट कितीतरी वेळा त्यांनी आपल्या प्रवचनात सांगितली आहे.

पू. बाबा मालाडला राहत. साहजिकच अण्णांचं बाबांकडे मालाडला खूप वेळेस जाणं व्हायचं. पू. बाबांमुळेच पू. तात्यासाहेब केतकरांची भेट होऊ लागली. अण्णा नेहमी म्हणत 'मला तीन सत्पुरुषांचा सहवास मिळाला आणि मी धन्य झालो, पू. गुरुदेव रानडे, पू. तात्यासाहेब केतकर, पू. बाबा बेलसरे! अर्थात हे सारे पू. बाबांमुळे शक्य झाले. त्यामुळे अण्णांच्या जीवनात पू. बाबांचे एक वेगळे स्थान होते.

मी पू. बाबांना प्रथम कधी पाहिलं ते आठवत नाही. आम्ही दोघी बहिणी खूप लहान होतो. आई-अण्णा आम्हाला घेऊन बऱ्याच वेळा पू. बाबांकडे घेऊन जायचे. मला त्यांच्याकडे जायला आवडायचे. त्याची कारणं मात्र मजेशीर होती. हे आजोबा (पू. बाबा) आणि आजी,

दोघेही खूप प्रेमळ होते. त्याचे सुपुत्र श्री श्रीपाद काका, सुनबाई शोभाकाकू अतिशय प्रेमाने, अगत्याने स्वागत करत. बाबांच्या नाती आमच्यापेक्षा लहान, पण त्यांच्याशी खेळायला मजा यायची, आणि प्रत्येकवेळी शोभाकाकू आजी काहीतरी छान खाऊ, लाडू वड्या समोर ठेवत. त्याचही आकर्षण असायचं. आम्ही निघालो की नमस्कार केल्यावर पू. बाबा 'या बरं बाळ' असं इतक्या मधुर भावात म्हणायचे कि ते शब्द अजून कानात घुमतात. या शब्दातच खूप मोठे आशीर्वाद दडले होते हे मला नंतर समजलं.

वाढत्या वयानुसार पू. बाबा म्हणजे फार वेगळं महान व्यक्तिमत्व आहे याची जाणीव होऊ लागली. मोठमोठे उद्योगपती, डॉक्टर्स, प्रथितयश कलाकार, उच्चभ्रू उच्चशिक्षित मंडळी नम्रपणे पू, बाबांच्या पाया पडत. अर्थात या सर्वांशी बोलताना बाबांच्या बोलण्यातील मृदुता, आर्जव तसच असायचं. अण्णांची आणि पू. बाबांची चर्चा बहुतांशी संस्कृत/ तत्वज्ञान यावर असे. त्यावेळी माझी तितकी प्रगल्भता नव्हती. त्यामुळे हे संवाद लिहून ठेवले नाहीत.

पू. गुरुदेव असताना अण्णा निंबाळला गेले तर पू. बाबांचा नमस्कार त्यांना सांगत. बाबांचं नाव घेतलं कि पू. गुरुदेवांच्या चेहऱ्यावर प्रसन्न स्मितहास्य उमटे. ते बाबांची अत्यंत आस्थेने चौकशी करत असत. पू. बाबांबद्दल त्याचं मत होतं- 'What a fine man he is' पू. गुरुदेवांच्या मते 'fine man' ची व्याख्या म्हणजे 'अध्यात्मिक उच्चकोटीचा सत्पुरुष'! अशा पू. बाबांचा सहवास आम्हाला मिळाला हे आमचे महद्भाग्य!

माझ्या आईला पू. तात्यासाहेब केतकर (वाणीरूप श्रीमहाराज) यांजकडून अनुग्रह मिळाला. या पुढच्या पिढीत गोंदवले-निंबाळ असे दोन्हीकडचे अनुग्रहित आहेत. श्री सद्गुरूंची कृपा अशी कि अत्याधुनिक विज्ञान युगातील हि उच्चशिक्षित तरुण पिढी स्वदेशात/परदेशात हा पारमार्थिक वसा आनंदाने सांभाळत आहे. प्रापंचिक अडचणी, संकट येतच असतात. प्रसंगी डगमगायला होतं क्वचित धीरही खचतो, आपली श्रद्धा कुठेतरी कमी पडतेय हे जाणवलं तरीही सद्गुरू मात्र आपला हात सोडत नाहीत आणि अलगद पैलतीराला नेतात. मागे वळून पाहिलं कि जाणवतं यात आपलं कर्तृत्व नव्हतंच. त्यांनीच आणल इथपर्यंत!

पू. बाबा बेलसरे यांच्यामुळे सुरु झालेला सद्गुरू कृपेचा हा अखंड वारसा ज्यांना लाभला ते भाग्यवान! आणि हा वारसा आहे तरी कसा? 'न चोरहार्यं न राजहार्यं, न भातृभ्राज्यं न च भारकारि' चोर चोरी करू शकत नाही, राजा जप्त करू शकत नाही, भावंडामध्ये वाटणी नाही की त्याचं ओझंही नाही. हा ओघ पुढेही असाच चालू राहावा हि सद्गुरू चरणी प्रार्थना !

**सौ. दयुती उपाध्ये-केसकर**

# श्री चैतन्य बावनी

**(परमपूज्य श्री रंगअवधूत महाराजांच्या 'दत्तबावनी' वर आधारित)**

श्री ब्रह्मचैतन्य दयाळ । तूचि एक जगती प्रतिपाळ ।।१।।
रावजी गीता करुनी निमित्त । प्रकटसी जगकारण निश्चित ।।२।।
रामदास मारुति अवतार । शरणागतासी तूं आधार ।।३।।
वेद शास्त्र हे तव निर्माण । चैतन्य ब्रह्म तू निश्चित जाण ।।४।।
रामनाम हाती जपमाळ  कंठी शोभे तुळशीमाळ ।।५।।
गौरवर्ण तव प्रसन्नमुख । पाहता होते आत्मसुख ।।६।।
त्रिपुंड भाळी केशरी । सुंदर कफनी भरजरी ।।७।।
पायी निर्गुण छान खडावा । प्रखर वैराग्याचा ठावा ।।८।।
नित्य रामनामी दंग । चढवी भक्तां नामरंग ।।९।।
योगेश्वर अनब विद्यावान । दीनांचा जो आश्रयस्थान ।।१०।।
माणगंगातीरी गोंदावली अवतरले अमुचे स्वामी ।।११।।
बाळपणीच्या खेळात । रंगुनी जाती नामात ।।१२।।
गुणी बाळ हा गणपती । प्रणवस्वरुपी निश्चिती ।।१३।।
तुकामाईची कठिण परिक्षा । उत्तीर्ण करुनी घेई दीक्षा ।।१४।।
मर्जी होऊनी तुकाईची । आशिर्वाद तो मिळवुनी घेई ।।१५।।
त्रिवार करुनी भारतभ्रमण । पचवुनी ज्ञान होई सुजाण ।।१६।।
राममंदीरे स्थापूनी । उद्धरी जना नाम देऊनी ।।१७।।
आल्या अतिथा अन्न देती । रामनामही वदवून घेती ।।१८।।
वेड लाविले रामासी । नेत्री त्याच्या अश्रू येती ।।१९।।
निजमाऊलीला मान देती । तीर्थयात्रा तिज करवीती ।।२०।।
कधी न कोणा दुखवीती । विष देणाऱ्या अनुग्रह देती ।।२१।।
पिशाच पीडा करिती दूर । अगाध महिमा पसरे दूर ।।२२।।
ब्राह्मणस्त्रीचा मृत भर्तार । काशीस केला सजीव निर्धार ।।२३।।
महिमा टाळण्या ते वेळी । अदृश्य झाले ते काळी ।।२४।।
दुष्ट मानवी मारण्या येती । तरीहि कृपा तयावरी करिती ।।२५।।
होडी बुडतां पाण्यांत । वाचविले त्वां निजभक्त ।।२६।।
काशी विप्रसभा भरवीली । नाम महिमा पटवीली ।।२७।।
शिवोहं म्हणती वेदांती । तसेच कांही सन्यासी ।।२८।।
विषय भोगिती प्रापंची । लाविती त्यांना नामासी ।।२९।।
योग याग ज्ञान तप । नामाने ते होती प्राप्त ।।३०।।
नका करू आटा आटी । नाम जपा हो ऊठाऊठी ।।३१।।
हरुनी विप्रमद ते वेळी । ठसविले रामनाम चित्ती ।।३२।।
सोपे साधन दुजे नाही । भवसागर हा तरण्या पाही ।।३३।।
हेचि सांगण्या गुरुमाऊली । पूर्ण आयुष्य कळवळली ।।३४।।
नाम देऊनी भिल्लांसी । शांतवून उद्धरिले त्यासी ।।३५।।
मार्गी देखतां रोगी एक । पोहोचविला रामेश्वरी देख ।।३६।।
घेतल्या धेनू कसायाकडूनी । सांभाळिती त्या लेकी जाणूनी ।।३७।।

## श्री चैतन्य बावनी

लंगडी गाय लाडकी ती । बत्ताशा घोड्यावर प्रीती ।।३८।।
हांक मारिता धावून येती । स्मर्तृगामी ते असती ।।३९।।
गोदूघरच्या मुंजीत । तूप वाढती पंगतीत ।।४०।।
योग्याने कावड आणिली । रामेश्वर जाणून अर्पिली ।।४१।।
अंतकाळ तो साधून देती । शिवशंकर हे निश्चिती ।।४२।।
अशी ही लीला विविध ही सर्व । वर्णिल कोण नर ती सर्व ।।४३।।
अधमा तारक तव रामनाम । जपता होई तो निष्काम ।।४४।।
तोषविले निजभक्त सुजात । देऊनी प्रचिती तू साक्षात् ।।४५।।
शरणागत मी बाळ अजाण । ऊठ दयाळा जाती प्राण ।।४६।।
आता नको करू विलंब । तुजविण मजला ना अवलंब ।।४७।।
वंदन तुजला वारंवार । नाम श्वास हे तव निर्धार ।।४८।।
देवा असशी तू सुखधाम । आम्हां देई अखंड नाम ।।४९।।
ऐसी कृपा करुनी आम्हा । सार्थक करिसी या जन्मा ।।५०।।
अनन्य भावे गाई जो नेमे । चैतन्य बावनी अती सप्रेमे ।।५१।।
लाभो गुरूची कृपा अगाध । रंगुनी जावो गुरुप्रेमांत ।।५२।।

। श्री सद्गुरुहृदयार्पणमस्तु ।

**(स्व.) सौ. संध्या अ. संध्ये**

काव्य सुमने

काव्य सुमने

## श्रीगोंदवलेकर महाराज

पवित्र गोंदवले ग्रामी, जन लाविले हो नामी
सद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यांनी, श्रीराम दिले हो ध्यानी
श्री महाराज दिनरात, करती हो नामाची खैरात
भक्त जपती आनंदात, सदा श्रीरामनाम मुखात
उपदेशती त्वरा करा, चित्ती श्रीराम घट्ट धरा
नाम तारी भवसागरा, नेई नामच हो पैलतीरा
श्रीब्रह्मचैतन्यी जे रंगले, श्रीरामनामी दंगले
नामाचे ते झाले, भक्त रामाचे ते झाले
श्रीमहाराज गोंदवले, श्रीराम नाम गोंदवीले
भक्तांहृदयी कोंदले, आत्मारामा तोषविले

**एक साधक**

# सुखद चैतन्योपासना केंद्र वांते (सत्तरी) गोवा



**कथा.. एका (नव्हे आपल्या) उपासना केंद्राची**

'सुखद' चैतन्योपासना केंद्र वांते (सत्तरी) गोवा- हा केवळ एक पत्ता नाहीये. कारण हे एक ठिकाण नाहीये. हे आहे एक उपासना केंद्र! गोव्यातील काही साधक मंडळींना यासाठी जागा हवी होती. जिथं असेल शुद्ध हवा, वाहतं पाणी, रम्य परिसर नि शांत वातावरण. अशी जागा मिळणं सोपं नव्हतं पण एका अज्ञात व्यक्तीच्या माध्यमातून सद्गुरूंनी जागेचा प्रश्न सोडविला. विनायक नवाथे हे त्या व्यक्तीचं नाव. त्यांनी सुकड-वांते येथील जागा आग्रहानं दाखवली नि प्रेमानं देऊ केली. कुणाच्याही नकळत आपलं उपासना केंद्र सुरू झालं देखील. दिसामासांवर्षांनी ते विकसत गेलं अनेक बाबतीत.




एका कीर्तनकार बुवांच्या प्रेरणेनं 'सुकर-वांतें'चं 'सुखद-वांतें' झालं. दुसऱ्या बुवांच्या पुढाकाराने केंद्रात नामसाधनेची मुहुर्तमेढ रोवली गेली तर तिसऱ्या बुवांच्या प्रतिभेतून प्रकटलेलं 'अभंग चैतन्य' हे पहिलं पुस्तक केंद्रातर्फे प्रकाशित झालं. अनेक प्रथितयश तसेच उदयोन्मुख कीर्तनकारांची वरचेवर उत्स्फूर्त सेवा येथे लाभत राहिली आहे. केंद्र सुरू तर झालं, पण ते सुरू राहिलं पाहिजे ना? केंद्रातील उपासनापद्धती ही वेळोवेळी श्रीमहाराजांच्या प्रेरणेनं अनेक जाणत्या, अनुभवी साधकांच्या सूचनांनुसार, मार्गदर्शनानुसार तयार होत गेली. उपासनेचं स्वरूप अधिकाधिक आध्यात्मिक राखण्याचा प्रयत्न केला गेला. विविध कर्मकांडं किंवा नुसत्या मनोरंजनाचे कार्यक्रम शक्यतो टाळण्याकडे आपला कल राहिलाय. त्याऐवजी नामस्मरण- सामूहिक नामजप- मानसपूजा-ध्यान-मौन यावर भर दिला जाऊन वाचन (पारायण)-मननचिंतन श्रवण-स्तोत्र, मंत्रपठण-काकडारती-अभिषेक-नैवेद्य-महाप्रसाद अशा उपासना प्रकारांचा आधार केंद्रात घेतला जातो.

**वर्षांत वर्षारंभ उपासनाः** दर वर्षाचे शेवटी २५ डिसेंबर ते १ जानेवारी अशी केली जाणारी वर्षान्त- वर्षारंभ उपासना हे आपल्या केंद्राचं वैशिष्ट्य. या काळात स्वतःच्या जीवनातील भूत-वर्तमान काळातील घटनांचा चढउतारांचा आढावा घेऊन भावी काळाबद्दलच्या कल्पना

## सुखद चैतन्योपासना केंद्र वांते (सत्तरी) गोवा

योजना श्रीमहाराजांच्या चरणी अर्पण करण्यावर भर दिला जातो. बाहेरून आपल्या अंतरंगात नेणाऱ्या अभ्यासाला आपण ‘प्रत्याहार उपासना’ असं नाव दिलंय. हा प्रत्यक्ष अनुभवाचा विषय आहे. याला जोडूनच चालू वर्षाला निरोप ‘दीपाराधना’ करून दिला जातो. शेकडो ज्योतींच्या प्रकाशात श्रीमहाराजांच्या मूर्तीवर एका लयीत नामाभिषेक करताना साधकांचे सात्त्विक भाव जागे होतात. तसेच नववर्षाच्या स्वागतासाठी केलेला दीपोत्सव हाही त्यावेळच्या केलेल्या प्रातः चिंतनामुळे हृद्य बनतो. नूतन वर्षाची पहाट तर अमृताची झालेली असते. तीही सद्गुरुंच्या सान्निध्यात, त्यांच्या पायाशी नि त्यांच्याच आशीर्वादानं. याचीही प्रत्यक्ष अनुभूती घ्यायला हवी.

**समाजभान जागवणारे कार्यक्रम उपक्रम:** समाजातील महिला-युवा विद्यार्थी शिक्षक अशा गटातील व्यक्तींसाठी मार्गदर्शनपर शिबिरं, शाळेतील मुलांसाठी अभ्यास कौशल्यं, वाचनाची अभिरुची, व्यक्तिमत्त्व विकास, चारित्र्याची जडणघडण असे वर्गही आयोजित केले जातात. त्याचप्रमाणे मुलींच्या रक्ताची तपासणी व इतर महत्त्वाची आरोग्य विषयक माहिती देण्यासाठी वर्गांचं आयोजनही केलं जातं.




**पुस्तक प्रकाशन:** आजपर्यंत केंद्राच्या माध्यमातून अनेक छोटीमोठी पुस्तकं प्रकाशित झाली. मुख्यतः आध्यात्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विषयावरची ही पुस्तकं आहेत.

वास्तु विकास आरंभ झाला घराच्या एका छोटयाशा खोलीत. तसं पाहायचं तर केंद्रात येताना मातीचा रस्ता संपून जिथं बारमाही झुळझुळणाऱ्या ओढयावरच्या पायऱ्या सुरू होतात, त्यांच्याजवळ असलेल्या पिंपळाच्या साक्षीनं हे केंद्र सुरु झालंय. म्हणजे पहिली उपासना चुडतं-चिरे लावून पेडाच्या (पाराच्या) आधारानं तयार केलेल्या आडोशात संपन्न झाली. तो दिवस होता १९९३ सालातील मार्गशीर्ष शु.द्वितीया. नंतर श्रीमहाराज कृपेनं उपासना सुरू झाली व चालू राहिली. सारी श्रींची इच्छा!

**भोजनगृह नि साधकनिवास:** काळाच्या ओघात वांतें येथील सावईकर कुटुंबियांनी सध्या ज्या जागेत केंद्र विस्तारलं आहे ती जागा आपल्याला दान केली. त्यामुळे मंडपांचं नूतनीकरण, अन्नपूर्णा भोजगृह, साधकांसाठी निवास अशी बांधकामं झाली. श्रीमहाराजांच्याच प्रेरणेनं त्या त्या टप्प्यांवर निरनिराळ्या व्यक्ती उत्स्फूर्तपणे उभ्या राहिल्या नि आपल्या देखरेखीखाली कामं करून घेतली. सारी सद्गुरूंची इच्छा नि सत्ता!

**श्रीमहाराजांचं विविध रूपात आगमन:** अगदी आरंभी श्रीमहाराजांची छोटी प्रतिमा. प्रत्येकाच्या घरात असते तशी. नंतर श्री स्वामी समर्थांनी आपल्या एका स्थानिक भक्ताच्या स्वप्नात जाऊन प्रेरणा दिली नि श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची चित्रकारानं रंगवलेली प्रतिमा उपासनेसाठी उपलब्ध झाली. नंतर खूप मोठी भव्य दिसणारी प्रतिमा अशीच आकस्मिक योगातून मंडपात येऊन स्थिरावली. नंतर श्रीमहाराज व पाठीमागे श्रीराम अशी मोठी प्रतिमा अवतरली आणि आता एका प्रसिद्ध चित्रकारानं चितारलेली मोठी प्रतिमा पारायण कक्षात स्थापन

## सुखद चैतन्योपासना केंद्र वांते (सत्तरी) गोवा

झाली आहे. ध्यानगुंफेतली शांतवत्सल प्रतिमा हा श्रीमहाराजांच्याच इच्छेचा आविष्कार आहे. पण केवळ प्रतिमारूपातलं अस्तित्व अपुरं आहे असं श्रीमहाराजांना वाटलं नि त्यांनी एका साधक भक्ताला प्रेरणा देऊन आपली पंचधातूची सुंदर मूर्ती केंद्राला देववली.
सारी त्यांचीच लीला !

अशाप्रकारे आपली वाटचाल चालू राहिलीय. यात प्रमाणापेक्षा प्रकाराला निश्चित महत्त्व आहे. आरंभी केलेला आध्यात्मिक उपासनेचा निर्धार अजूनही चालू आहे. उपासना ही मनाची मशागत असते. त्यासाठी आवश्यक असते दृष्टी- सद्गुरूंची कृपादृष्टी.




त्यासाठी हवी व्यष्टी (आपण स्वतः)-समष्टी (समाज) सृष्टी (निसर्ग) नि परमेष्टी (ईश्वरी शक्ती) यांच्याकडे पाहावयाची संजीवक दृष्टी जी आपल्याला मिळत आलीय सद्गुरु श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या इच्छेनं... प्रेरणेनं... सत्तेनं नि कृपेनं! ही चैतन्य दृष्टी मिळवण्यासाठी उपासना करावयाच्या केंद्राला म्हणूनच आपण म्हणतो- 'सुखद' चैतन्योपासना केंद्र !

**रमेश सप्रे**

काव्य सुमने

## भजन

रामा आता नको लावू वेळ
तुझ्या चरणांचे, लागू दे रे ध्यान
रामा आता नको लावू वेळ ।।ध्रु।।
तुझ्या स्वरूपाची लागलीसे ओढी
तुझी या नामाची लागू दे रे गोडी
लोचनांच्या पाती, दृष्टी असे स्थिर
रामा आता नको लावू वेळ ।।१।।

खोटा हा प्रपंच खोटी असे माया
धावतो संसार सर्व सुख घ्याया
परि हाती येई, मृगजळ पान
रामा आता नको लावू वेळ ।।२।।
सत्य तुझे नाम सत्य हे स्वरूप
मन उतावेळ पाहण्या आतुर
दिनदासांचे दास आम्ही दीन
रामा आता नको लावू वेळ ।।३।।

**सौ. पुष्पा सरवटे करंबेळकर**

# ‘सुखद’ चैतन्योपासना केंद्रः एक दृष्टीक्षेप

आपल्या ‘सुखद’ चैतन्योपासना केंद्राचे द्वितपःपूर्तीचे हे वर्ष आहे. सदगरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचे नामाधिष्ठान आपल्या केंद्राला लाभले आहे. ‘उपासनेला दृढ चालवावे’ हे आपले ब्रीद वाक्य आहे. उपासनेचे विविध मार्ग चोखाळताना नामस्मरण हे प्रधान साधन चैतन्योपासनेसाठी इथे आचरले जाते. सातत्याने खोल आणि उत्कट साधना व्हावी म्हणून केंद्रात उपासनेची नियमित व नैमित्तिक सत्रे असतात.

- दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व चौथ्या रविवारी तेरा तास ‘श्रीराम जयराम जयजयराम’ या त्रयोदशाक्षरी मंत्राचा अखंड जप, रामनवमी, कृष्ण जन्माष्टमी, वेदव्यास पौर्णिमा अर्थात गुरुपौर्णिमा, सदगुरूंचा जयंती व पुण्यतिथी उत्सव, शिवरात्री उत्सव, वर्षान्त वर्षारंभ उपासना, दर शुक्रवारी भजनाचा कार्यक्रम असा परिपाठ आहे.
- दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व रविवारी मासिक उपासना असते. शनिवारी पहाटे ५ ते संध्या.६ पर्यंत तेरा तास माळेवर जप केला जातो. मासिक उपासनेच्या शनिवारच्या संध्याकाळच्या सत्रात सामूहिक नामजप, करुणाष्टके, विष्णू सहस्त्रनाम सहचिंतनाची दोन सत्रे, आरती, प्रसाद, महाप्रसाद, मौनसाधना, ध्यानगुंफेतील साधना असा कार्यक्रम असतो. रविवारी पहाटे काकड आरती, मानसपूजा. नामसाधना वैयक्तिक आणि सामूहिक, सहचिंतनाची दोन सत्रे, महाराजांच्या त्या दिवशीच्या प्रवचनाचे वाचन, आरती, महाप्रसाद असा रविवारी दुपारपर्यंतचा कार्यक्रम असतो.




  दर महिन्याला किमान ३० तास म्हणजे १२ महिन्यांचा किमान ३० तास महाराजांच्या छत्रछायेखाली साधकांची साधना व्हावी, त्यातून मिळणाऱ्या स्थूल सूक्ष्म मार्गदर्शनातून प्रत्येक साधकाचे जीवन प्रकाशमय व्हावे हा हेतू.
- चैत्र महिन्यात गुढीपाडवा ते रामनवमीपर्यंत यथाशक्य नामसाधना, रामनवमीच्या दिवशी रामजन्मोत्सव. त्या दिवशी रामजन्माचे कीर्तन, न्हाणी, पाळणा, आरती, प्रसाद, महाप्रसाद, तोच दिवस समर्थांचा जयंती दिन असल्याने समर्थ विचारांवर कीर्तनातून वा इतर उपक्रमातून चिंतन असा कार्यक्रम असतो.
- आषाढी एकादशी अर्थात शयनी एकादशीपासून आषाढी पौर्णिमेपर्यंत विशेष गुरुपौर्णिमा उपासना असते. यात नामसाधना, भजन, गुरुपौर्णिमेच्या दिवशी व्यास व महाराजांचे पूजन, आत्मनिवेदन व संकल्प साधना, नामसाधना, गायनसेवा, मौनसाधना, ध्यानगुंफासाधना असते. दररोज काकड आरती, मानसपूजा, नित्यपाठातील त्या त्या दिवशीची उपासना गुरुपादुकाष्टक करुणाष्टके विष्णुसहस्रनाम, आरती, महाप्रसाद असा कार्यक्रम असतो. श्रावणमास व आश्विन महिन्यातील शारदीय नवरात्रकालात सहचिंतन केले जाते. कार्तिक

## ‘सुखद’ चैतन्योपासना केंद्रः एक दृष्टीक्षेप

महिन्यात प्रबोधिनी एकादशी अर्थात चातुर्मास्य समाप्तीच्या निमित्ताने भजन, नामजप, आरती, प्रसाद असा कार्यक्रम असतो. मार्गशीर्ष महिन्यात गीता जयंती, दत्तजन्म हे कार्यक्रम येतात.



* मार्गशीर्ष वद्य दशमी हा श्रीमहाराजांचा पुण्यतिथीचा दिवस. तत्पूर्वी काही दिवस विशेष उपासनेचे आयोजन केले जाते, अखंड नामसाधना केली जाते. पुण्यतिथी दिनी पहाटे काकड आरती. प्रातः चिंतन, महाराजांचा निर्वाण प्रसंग वाचन (आबा कुबल) तद्नंतर पहाटे श्रींच्या निर्वाणानिमित्त मूर्तीवर पाकळ्यांचा वर्षाव, अर्थात गुलालोत्सव. तद्नंतर अर्धा तास पवित्र गंभीर वातावरणात प्रातः चिंतन, तीर्थप्रसाद नाश्ता, त्यादिवशी अधिकाधिक सामूहिक नामजप असा कार्यक्रम असतो.

* माघ शु. द्वादशी अर्थात महाराजांचा जयंती उत्सव. पहाटे काकड आरती, प्रतिमापूजन, जन्मोत्सवाचे कीर्तन, न्हाणी, पाळणा, आरती, मंत्रपुष्प, गायनसेवा, भजन, यथाशक्य सामूहिक नामजप असा कार्यक्रम असतो. महाशिवरात्री निमित्ताने विशेष उपासना, शिवपूजन, बिल्वार्चन, ‘ॐ नमः शिवाय’ मंत्रोच्चारात संपन्न होते. तद्नंतर सहचिंतन, भजन, नामसाधना, आरती, रात्री यामपूजा व ‘निषिय’काली उत्कट उपासना केली जाते. याशिवाय आपल्या केंद्राचा उपासनेचा महत्त्वाचा उपक्रम वर्षान्त वर्षारंभ उपासना. डिसेंबर महिन्याच्या शेवटचा आठवडा व जानेवारी १ अशी किमान एक आठवडा विशेष उपासना असते. त्या त्या वर्षातील संकल्पित उपासनेवर चिंतन करून उपासनेतील त्रुटी, उपासना पद्धती, वैयक्तिक चिंतन, सामूहिक उपासनेसंदर्भात सहचिंतन करून सदगरुंना आगामी वर्षात संकल्पित साधनेसाठी श्रीमहाराजांची प्रार्थना केली जाते.

* चातुर्मासातील चिंतनासाठी आजपर्यंत श्रीज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामांची गाथा, अभंग ज्ञानेश्वरी, रामकृष्ण वचनामृत, दासबोध, बाबा बेलसरे यांचे आनंदसाधना व इतर वाङ्मय, रामचरितमानस, श्रीमद् भगवतगीता यांसारख्या ग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी साधकाला मार्गदर्शन केले जाते. दोन वर्षांपासून आपल्या केंद्रात साप्ताहिक भजनसेवा, भजनसाधना सुरू झालेली आहे. संगीतात ज्यांना गती आहे, आवड आहे त्यांना श्रीमहाराजांनी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिलेले आहेच, सर्वच भजनी कलाकार हे साधक आहेत, ते न चुकता महाराजांच्या चरणी भजनसेवा, नामजप अर्पण करतात आणि महाप्रसाद घेऊन कृतार्थ होतात. इथे येणारा प्रत्येक माणूस साधक व्हावा आणि प्रत्येक साधक चांगला माणूस व्हावा. महाराजांचा परिसस्पर्श त्याला व्हावा. त्या चैतन्यस्पर्शाने त्याला उपासनेची प्रेरणा मिळावी. उपासनेतून आवश्यक सकारात्मक ऊर्जा प्रत्येकाला मिळावी. हाच केन्द्राचा मुख्य हेतु आहे.

श्रीमहाराज
उपदेशामृत

## गुरुकृपेचे साधन

श्रीगणेशायनमः श्रीमारुतीरायायनमः ।। श्रीरामरामाय नमः । श्रीजानकी वल्लभायनमः ।। श्रीउमारमणायनमः ।। श्रीदत्तात्रयाय नमः ।। श्रीरुक्मिणी पांडुरंगाय नमः ।। संत साधू ऋषी मुनी भगवद्भक्त तत्व ज्ञानी ।। सद्गुरु मातापिता वंदूनी तयांचे चरण । सकळ तिर्थांशीं लोटांगण ।। वेद मूळ आकार तया आदि हरि राम कृष्ण सर्वेश्वर ।। निर्गुण निरंजन साकार ।। तयाशी माझा नमस्कार ।। सद्गुरु प्रणवरूप परमेश्वर ।। तयाशी माझा नमस्कार ।। मनुष्य देह बहुत दुर्लभ ।। पुन्हा नाही ऐशी वेळ ।। म्हणुनि जिंका कळी काळ ।। ज्ञान भक्तिचें उपाय ।। प्राप्त होती लवलाहि ।। जीवन्मुक्तचि होय जीव ।। चार वेद सहा शास्त्र अठरा पुराण ।। अष्टांग संतसंग ।। चौदा विद्या चौसष्ट कळा ।। सर्व साधनांचे फळ गुरुकृपेशी पात्रता ।। सांगेन ते ऐका आतां ।। प्रथम वैराग्य अंतरी ।। दृढ व्रत ब्रह्मचारी ।। निर्भय चित्तवृत्ती ।। अक्रोध दया शांती ।। स्वधर्मी सदा रत ।। स्नान संध्या निष्ठावंत ।। शरण जाय राम पाया ।। करी दीनावरी दया ।। श्रवण, भजन, कीर्तन ।। निजध्यासीं लावी मन।। जन्मा आल्याचें फळ ।। स्वधर्म करी जतन ।। परउपकारी देई प्राण ।। आश्रमाप्रमाणे आचरण ।। शत्रु मित्र एक जाण ।। निरुद्योगी न करी पिंड पोषण ।। माता पिता बायकामुलांचे करावे यथाशक्ति रक्षण ।। हे एक माडयांचे काम ।। याशी अंतर घडू नये जाण ।। जोंवरी देहाभिमान तोवरी पाहिजे आश्रमानुसंधान ।। ज्याशीं देह अभिमान संरला ।। त्याशी हा भाग नाहीं उरला ।। देह अभिमान करी निरसन ।। मन वृत्ती ठेवी आधीन ।। नामस्मरण काढी वेळ ।। नसे चित्तास तळमळ ।। शत्रु मित्र एक जाण ।। नसे मान अपमान ।। सदां राहे समाधान ।। गर्वरहित ज्यांचे मन ।। शुद्ध चित्त निर्मळ सत्य भाषण ।। सर्वकाळ विषय सन्निध असता ।। क्षोभ न होय ज्यांचे चित्ता ।। धैर्य बळाचा स्वामी ।।

श्रीमहाराज

# उपदेशामृत

शुद्ध निर्मळ अंतरयामीं ।। अंतर वाह्य शुद्ध मन ।। न करी कोणाचें खंडण ।।
न पाहे गुण दोष सदा अंतरी उदास ।। दान धैर्य दाता ।। दीनालागी माता पिता
।। न करी कांहीं हिंसा ।। मनी सत्याचा भरंवसा ।। न धरी मानवाची आस ।।
नाम जपे श्वासोच्छवास।। नसें द्रोह मत्सर । समबुद्धी निरंतर ।।
प्रसन्न चित्त सदोदित ।। निष्ठावंत भगवद्भक्त ।। नीच संगतीचा त्रास ।।
संत चरणीं रहिवास ।। देह प्रारब्धावर टाकी ।। जो होईल तो आनंद मानी ।।
यत्न प्रयत्न करावा ।। शेवटास न गेल्याचा खेद न करावा ।। नाशिवंत संसारात
खेद केला तर परमार्थात काय उरले ।। परमार्थ न होईल हा खेद आणि होईल
तो आनंद ।। सोडुनि षड्रिपूंचे बंधन ।। जागृती ठेवी मन ।।
आत्मवत् विश्व मान ।। रामनामा वाचून एक पळ न पडे अंतर ।।
ऐसा साधी वेळ ।। जिकडे जिकडे जाय दृष्टी ।। राम रूप पाहे ।। सृष्टी पशु पक्षी
नष्ट खळ ।। दुष्ट दुर्जन कैसें समजावे ।। अहंभाव नसता कलेवर ।।
स्वानंद नाम निरंतर ।। अहं ब्रह्म म्हणू नये आपण ।। जाणावे तितकें मीपण हेंच
अज्ञान ।। सर्व साधन साधल्याची खूण ।। दया शांती नम्रता ।।
जितेंद्रिय अजिंक्य मन ।। आली ऊर्मी करी जतन ।। गर्व रहित मन ।।
जन प्रिय सत्य भाषण ।। निर्लोभ वासना रहित ।। मद मत्सर नसे मनांत लेश
।। गुरुवचनीं विश्वास ।। सुखदु:ख, मानापमान, परनिंदा, परधन ।।
परपीडा, परदारा, परदोष दुर्गुण ।। वादविवाद, श्रेष्ठाचार, दंभ, प्रीति, शोक,
कपट ।। यांचा कधीं नसावा विटाळ ।। नामस्मरण सर्वकाळ ।।

।। जयजय रघुवीर समर्थ ।।

- ज्ञानोपदेश